3/c

# चौकशी अहवाल

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड,

"गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा

१४वी गल्ली, मुंबई-४०० ००८.

इमारत कोसळण्याबाबतचा अहवाल.

इमारत उपकर क्र.ई-२१५२

[इमारत कोसळण्याचा दिनांकः- ३०/०४/२०१६]

5/c

**इमारत क्र. १२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-४०० ००८ हि इमारत कोसळल्याबाबतचा चौकशी अहवाल.**

## इमारत उपकर क्र.ई-२१५२

## अनुक्रमणिका


| अनु.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | चौकशी अहवाल | ०१ ते १२ |
| २. | इमारत कोसळल्याबाबत चौकशीच्या अनुषंगाने संबंधीतांचे घेतलेले जबाब | १३ ते ३७ |
| ३. | इमारत कोसळुन झालेल्या अपघाताबाबत वृत्तपत्रात आलेल्या बातमीचे कात्रण | ३८ |
| ४. | कार्यकारी अभियंता/ई-२ विभागाने सादर केलेला इमारत कोसळल्याबाबतचा अहवाल (**Collapse Report**) | ३९ |


**उपमुख्य अभियंता [परिमंडळ-३]**
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
दादर [पूर्व]

दिनांक :-३०/०५/२०१६

7/c

चौकशी अहवाल

विषय :- इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली,** मुंबई-४०० ००८ महानगर पालिका उपकर **क्र.ई२१५२** इमारत कोसळून झालेल्या अपघाता बाबत.
→ अपघात दिनांक ३० एप्रिल २०१६

१] प्रस्ताविक

**१.१:-** बृहन्मुंबई महानगर पालिका 'ई' विभागाच्या अंतर्गत कार्यरत कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ [म्हाडा] च्या कार्यक्षेत्रात कामाठीपुरा येथील इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-४०० ००८ महानगर पालिका दुरुस्ती उपकर क्र.ई-**२१५२** ही इमारत तळ + तीन मजल्यांची भारवाहक भिंती, लाकडी खांब, तुळया, जिना व सपाट छत अश्या पारंपरिक पध्दतीची बनलेली होती. सदर इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी दुपारी अकस्मात/अचानकपणे कोसळली. सदर इमारत हि १९४० च्या पूर्वीची म्हणजेच "अ" वर्ग या श्रेणीत मोडत आहे व त्यावेळी उपलब्ध साधन-सामुग्रीचा वापर करुन बांधण्यात आलेली होती.

**१.२:-** मंडळाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे मुंबई महानगर पालिका व म्हाडा / मुं.ई.दु.व पु.मंडळाच्या अधिका-या मार्फत दरवर्षी पावसाळयापूर्वी करण्यात येणा-या सर्वेक्षण व संयुक्त पाहणीमध्ये धोकादायक इमारतींच्या यादीत सदर इमारतीचा समावेश नव्हता. तरीसुध्दा सदर इमारत ही अकस्मात/अचानकपणे कोसळली हि वस्तुस्थिती आहे.

**१.३:-** सदर इमारतीची मंडळामार्फत प्रचलित धोरणाप्रमाणे वेळोवेळी पाहणी करुन सुरक्षिततेच्या उपाय-योजना करुन दुरुस्तीची आवश्यकता असल्यास त्याभागाचे दुरुस्ती काम हाती घेण्यात येते. या प्रकारे पूर्णपणे सनियंत्रण असून देखिल वरील उल्लेखित इमारत ही अकस्मात का कोसळली यासाठी उपलब्ध परिस्थितीचा आढावा घेऊन चौकशी

9/c

२] <u>चौकशी करीता अमलात आणलेली कार्यपध्दत</u>

**२.१:-** या इमारतीच्या अकस्मात कोसळण्या प्रकरणी, संबंधित कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग [श्री.संजय जाधव], उप अभियंता [प्रभारी] श्री.भोसले, वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मिन भांडारे, कंत्राटदार श्री.मोहन पी. शिंदे व त्या इमारतीत वास्तव्यास असणारे भाडेकरु/रहिवाशी व स्थानिक रहिवाशी यांचेशी संपर्क साधून व चर्चा करुन व त्यांचे लेखी जबाब घेऊन या प्रकरणी संपूर्ण पार्श्वभूमी समजून घेतली. तदनंतर कार्यकारी अभियंता /ई-२ विभाग/मुं.ई.दु.व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उपलब्ध नस्ती / रेकॉर्ड कागदपत्रे मागवून तपासणी केली.

**२.२:-** ज्यादिवशी म्हणजे दि.३०/०४/२०१६ रोजी दुपारी सदर इमारत कोसळली होती, त्यादिवशी लगेच मी [उपमुख्य अभियंता [परिमंडळ-३]/मुं.ई.दु.व पु.मंडळ] प्रत्यक्ष जागेवर जाऊन कोसळलेल्या इमारतीची व आजुबाजूच्या इमारतीची व डेब्रीज काढण्याच्या मदत कार्याची त्या ठिकाणी स्वत: उपस्थित राहुन पाहणी केली, त्यावेळी कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग व त्यांच्या कार्यालयाच्या अखत्यारित कार्यरत इतर संबंधित अभियंता लोकप्रतिनिधी महानगर पालिकेचे संबंधित अधिकारी घटनास्थळांवर उपस्थित होते.

३] <u>म्हाड कायदा १९७६ अन्वये कर्तव्य व जबाबदारी</u> :-

**३.१:-** या ठिकाणी सादर करण्यात येते की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण कायदा १९७६ यास अनुसरुन या कायदयातील भाग ८ अन्वये मुंबई शहर बेटावरील जुन्या उपकर प्राप्त इमारतीची मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडुन संरचनात्मक दुरुस्तीची कामे केली जातात.

**३.२:-** उपकर प्राप्त इमारतीची सदर कायदयानुसार खालीलप्रमाणे विभागणी केली आहे.

[<u>कलम ८४ (१) नुसार</u>]

१] १ सप्टेंबर १९४० पूर्वीची इमारत - "अ" वर्ग

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी ही "अ" वर्गातील म्हणजेच १९४० पूर्वीची बनलेली होती, त्याचप्रमाणे स्थानिक रहिवाशांकडुन असे समजले की, सदर इमारत ही १०० वर्षांपेक्षा जास्त जुनी होती.

**३.३:-** मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार दरवर्षी पावसाळयापूर्वी व वेळप्रसंगी भाडेकरुंच्या तक्रारीप्रमाणे उपकर प्राप्त इमारतीची संबंधित विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात येते व धोकादायक भागास आवश्यकतेप्रमाणे मंडळाच्या कंत्राटदारांकडून अंशत:/पूर्णत: पाडकाम, धोकादायक भागास टेकू लावणे अशी उपाय-योजना करण्यात येते. तसेच मंडळ निधी [उपकर निधी] व मा.आमदार [वि.स.स. व वि.प.स.] हयांच्या शिफारसीनुसार डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध निधीनुसार संरचनात्मक दुरुस्तीची कामे मंडळात नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून करण्यात येते व इमारतीतील वास्तव्यास असणारे भाडेकरु/रहिवाशी यांची जिवित व मालमत्तेचे नुकसानीपासून संरक्षण करण्यात येते, या प्रकारे मंडळामार्फत कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यात येते.

**४] <u>दुरुस्ती काम करण्यापूर्वी इतर कार्यवाही जसे की</u> :-**

**४.१:-** एखादया उपक्रर प्राप्त इमारतीची दुरुस्ती करण्यापूर्वी मंडळाच्या पॅनलवर असलेले नोंदणीकृत वास्तुशास्त्रज्ञ व उपअभियंता मार्फत प्रथम संयुक्त पाहणी करण्यात येते, त्यावेळी इमारतीतील उपस्थित गाळेधारक / भाडेकरु / रहिवाशी यांचेशी चर्चा करुन इमारतीची सद्य:स्थितीनुसार दुरुस्तीची कामे सर्वसाधारणपणे ठरविण्यात येतात व या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येते.

**४.२:-** त्यानुसार वास्तुशास्त्रज्ञा मार्फत इमारतीच्या दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्यात येऊन त्याची विभागीय कार्यालयात छाननी करुन प्रशासकिय मंजुरी करीता मुं.ई.दु.व पु.मंडळाकडे किंवा जिल्हाधिकारी / जिल्हा नियोजन व विकास परिषदकडे सादर करण्यात येते.

13/c

४.४:- प्रत्यक्ष दुरुस्ती कामाच्या वेळी इमारतीचा काही भाग किंवा पूर्ण भाग धोकादायक आढळला तर इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांना आवश्यकतेनुसार इमारत रिकामी करण्यास निर्देश देण्यात येते.

४.५:- या इमारतीची माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये नियमित पाहणीच्यावेळी जिन्याकडील धोकादायक अवस्थेत उभी असलेली धोकादायक ओलसर व फुगलेली भिंत व त्यास लागून पॅसज, संडास इत्यादी भागात जागेवरील परिस्थितीनुसार सुरक्षिततेच्या उपाय-योजना म्हणून आवश्यक त्या ठिकाणी पुरेसे टेकू लावणे व धोकादायक भींत काढण्यात आली होती. हि वस्तुस्थिती असुन सदर काम दि.०३/०२/२०१५ पासून सुमारे १० दिवसात पूर्ण करण्यात आले होते. त्याच प्रमाणे त्याभागाचे विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य निधीतून अनुक्रमे रक्कम **रु.२,४९,८५५/-** व रक्कम **रु.२,७३,८६८/-** करीता कंत्राटदार **श्री.मोहन पी.शिंदे** यास कार्यादेश अनुक्रमे **दि.०७/०४/२०१६ व दि.२८/०४/२०१६** रोजी देण्यात आले होते.

"उपरोक्त इमारतीत एकच जिना व त्यास लागून भिंतीचा भाग धोकादायक स्थितीत होता, त्यामुळे दुरुस्ती काम हाती घेण्यापूर्वीच त्या ठिकाणी वास्तव्यास असणा-या भाडेकरु/रहिवाशी यांनी राहती जागा सोडली होती" असे या ठिकाणी उल्लेख करणे गरजेचे आहे.

## ५] इमारत का कोसळली याची सर्वसाधारणपणे कारण मिमांसा :-

५.१:- सर्वप्रथम सदर इमारतीचे अचानकपणे कोसळण्याच्या दुर्घटनचे तात्कालिन कारण काय असावे, याचा विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्यास अनुसरुन उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली आहे व सर्व संबंधित म्हणजे इमारतीतील भाडेकरु/रहिवाशी, स्थानिक रहिवाशी, कंत्राटदार, वास्तुशास्त्रज्ञ, संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांचेशी सखोल चर्चा करुन त्यांच्याकडून लेखी स्वरुप जबाब

५.२:- लेखी स्वरुपात जबाब घेण्यात आलेल्या संबंधीतांचे संक्षिप्त अभिमत

खालीलप्रमाणे आहे :-

| अनु. क्र. | जबाब नोंदविणा-या संबंधीतांचे नांव | दिनांक | अभिप्राय/अभिमत |
|---|---|---|---|
| १. | मे.इगल कंन्स्ट्रक्शन, टेकु लावणे/तोडकाम करणारे कंत्राटदार यांचे प्रतिनिधी श्री.सलिम ए.खान | ०६/०५/१६ | १] इमारतीमधील जिन्यालगत १ला, २रा व ३-या मजल्यावरील धोकादायक अवस्थेत असलेल्या भिंतीचा भाग काढण्यात आला व त्यास लागून असलेल्या भागास टेकू लावले.<br>२] वरील कामा व्यतिरीक्त इमारतीमधील इतर भाग धोकादायक असल्याचे दिसून आले नाही. |
| २. | श्री.सुंदर शेट्टी इमारतीच्या तळ मजल्यावरील हॉटेल चालक | ०७/०५/१६ | १] इमारतीच्या जिन्याकडील भिंत, जिना इ. ठिकाणी दुरुस्तीचे काम वास्तुशास्त्रज्ञ यांचे देखरेखी खाली करण्यात येत होते.<br>२] मी माझे हॉटेल [दुकान] रिकामे केले होते. तथापी त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे येणे-जाणे चालु होते. इमारतीच्या समोर काँक्रीट रस्त्याचे खोदकाम चालु असल्याने इमारतीत काही प्रमाणात हादरे बसल्याचे जाणवले होते.<br>३] उपरोक्त दुरुस्ती कामा व्यतिरीक्त इमारतीमधील इतर दर्शनी भाग धोकादायक दिसून येत नव्हता. |
| ३. | श्री.मोहम्मद हनीफ अब्दुल रऊफ इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी खो.क्र.४, तिसरा मजला | ०७/०५/१६ | १] इमारतीच्या जिन्याकडील भिंत, जिना इ. ठिंकाणी दुरुस्तीचे काम वास्तुशास्त्रज्ञ यांचे देखरेखी खाली करण्यात येत होते.<br>२] मी माझी खोली रिकामी केली होती. तथापी त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे येणे-जाणे चालु होते. इमारतीच्या समोर काँक्रीट रस्त्याचे खोदकाम चालु असल्याने इमारतीत काही |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४] इमारत कोसळल्याचे मला समजल्यानंतर मी, साधारण दु.२.०० ते २.३० च्या सुमारास इमारतीमध्ये गेलो असता राजूजी मानाजी रोड या रस्त्यावर आमची इमारत कोसळल्याचे दिसले यामध्ये इमारतीचा दुरुस्ती केलेला भाग कोसळला नव्हता जसे की नव्याने बसविण्यात आलेल्या लोखंडी खांब व तुळया. |
| ४. | श्रीमती.शबाना रेहमत जमादार इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी खो.क्र.३, २रा मजला | ०७/०५/१६ | १] इमारतीच्या जिन्याकडील भिंत, जिना इ. ठिकाणी दुरुस्तीचे काम वास्तुशास्त्रज्ञ यांचे देखरेखी खाली करण्यात येत होते.<br>२] मी माझी खोली रिकामी केली होती. तथापी त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे येणे-जाणे चालु होते. इमारतीच्या समोर काँक्रीट रस्त्याचे खोदकाम चालु असल्याने इमारतीत काही प्रमाणात हादरे बसल्याचे जाणवले.<br>३] उपरोक्त दुरुस्ती कामा व्यतिरीक्त इमारतीमधील इतर दर्शनी काम धोकादायक दिसून येत नव्हता.<br>४] मी फेब्रुवारी २०१६ मध्ये राहती जागा रिकामी केली होती व इतर ठिकाणी राहायला गेलो. तथापि, त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे येणे-जाणे चालू होते. इमारतीच्या चालु दुरुस्ती कामा व्यतीरिक्त इतर दर्शनी भाग धोकादायक दिसून येत नव्हता. |
| ५. | श्री.रेहमत एनल जमादार इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी खो.क्र.२, १ला मजला | ०७/०५/१६ | १] इमारतीच्या जिन्याकडील भिंत, जिना इ. ठिकाणी दुरुस्तीचे काम वास्तुशास्त्रज्ञ यांचे देखरेखी खाली करण्यात येत होते.<br>२] मी माझी खोली रिकामी केली होती. तथापी त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे येणे-जाणे चालु होते. इमारतीच्या समोर काँक्रीट |

19/c

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४] इमारत कोसळल्याचे मला समजल्यानंतर मी साधारणपणे दु.३.०० ते ३.३० च्या सुमारास इमारतीकडे गेलो असता राजुजी मानाजी रोड या रस्त्यावर आमची इमारत कोसळल्याचे दिसले यामध्ये इमारतीचा दुरुस्त केलेला भाग कोसळला नव्हता. जसे की, नव्याने बसविण्यात आलेले लोखंडी खांब व तुळया. |
| ६. | श्री.आसिफ अहमद अब्दुल सत्तार अन्सारी<br>स्थानिक रहिवाशी | ०७/०५/१६ | कोसळलेली इमारत ही साधारणपणे १०० वर्षे जुनी होती हि इमारत दि.३०.०४.१६ रोजी अचानकपणे कोसळली या इमारतीच्या समोर काँक्रीट रस्त्याचे जे.सी.बी.च्या सहाय्याने सुमारे ८-१० दिवसापासून काम चालु होते व या रस्त्याच्या खोदकामामुळे आजूबाजूच्या इमारतींना हादरे बसल्याचे जाणवत होते. कोसळलेली इमारत १०० वर्षांपेक्षा जुनी असल्याकारणाने कोसळली असावी असे माझे वैयक्तिक मत आहे. |
| ७. | श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे,<br>वास्तुशास्त्रज्ञ | ११/०५/१६ | १] वास्तुशास्त्रज्ञ यांनी वि.प.स. व वि.स.स. निधी अंतर्गत हाती घेतलेल्या कामांविषयी माहीती विषद केली आहे.<br>२] सदर इमारतीचे दुरुस्ती काम हाती घेतल्यावर प्रत्यक्ष कामाच्या साईटवर देखरेख व सुचनांसाठी जात होतो.<br>३] इमारतीमध्ये एकच जिना असल्याने व तो वापरण्या योग्य नसल्याने इमारती मधील भा/र यांनी दुरुस्ती काम करण्यापूर्वी इमारत रिकामी केली होती.<br>४] इमारती समोरील काँक्रीट रस्त्याचे काम चालु होते व खोदकामामध्ये निघालेले राबीट जे.सी.बी. ने ठोकुन तुकडे करण्यात येत होते.<br>५] कोसळलेली इमारत ही १०० [illegible] |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | श्री.सुधीर रामदास येवले<br>तत्कालीन उप अभियंता<br>ई-२ विभाग | ११/०५/१६ | १] इमारतीमधील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकात केवळ उघडया डोळयाने दिसत असलेल्या धोकादायक भागाचेच दुरुस्ती काम गृहीत धरण्यात आले होते.<br>२] या इमारतीची दुरुस्ती काम सुरु करण्यापर्वी का.अ./ई-२ विभाग, वास्तुशास्त्रज्ञ, ठेकेदार, भा/र यांच्या समवेत दुसरी संयुक्त पहाणी केली होती व तदनुसार अंदाजपत्रकात गृहीत धरलेल्या कामा व्यतिरीक्त इतर दृष्य भाग धोकादायक किंवा पडझड होईल असा भाग दिसून आला नाही हि वस्तुस्थिती आहे. |
| ९. | श्री.मोहन पी.शिंदे, कंत्राटदार | ११/०५/१६ | १] वि.प.स. व वि.स.स. निधिनुसार मंजूर कामाबाबत माहिती विषद केली.<br>२] वास्तुशास्त्रज्ञ श्री.भांडारे यांच्या सुचनेनुसार दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात सुरु केले होते.<br>३] मंजूर दुरुस्ती कामाव्यतिरीक्त इमारतीत इतर भाग धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येत नव्हते.<br>४] या इमारतीच्या दुरुस्ती कामासाठी असलेले कामगार यांना दुरुस्ती कामाचा पुरेसा अनुभव होता. |
| १०. | श्री.संजय जाधव,<br>कार्यकारी अभियंता /<br>ई-२ विभाग,<br>मुं.ई.दु.व पु. मंडळ, | २७/०५/१६ | १] इमारतीची पहाणी केल्यानंतर आवश्यकतेनुसार वि.प.स. व वि.स.स. निधी अंतर्गत दुरुस्तीचे कामाविषयी माहिती विशद केली.<br>२] इमारतीचे दुरुस्तीचे काम करण्यापूर्वी सर्व संबंधीतांना समवेत दुसरी संयुक्त पहाणी करण्यात आली.<br>३] इमारतीतील भा/र यांनी आपल्या खोल्या रिकाम्या केल्या होत्या.<br>४] वास्तुशास्त्रज्ञ व ठेकेदारास यथायोग्य काळजी घेणे व तदनुसार इमारत दुरुस्तीचे काम काळजीपूर्वक करावे अशा सुचना |

21/

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ७] इमारतीमधील भिंतींच्या ओलसरपणामुळे त्यास लागून लाकडी खांब, तुळया, भार वाहक भिंत ज्या उघड डोळयांनी दिसत नव्हता तो भाग ठिसूळ व कमकुवत झाल्याने तसेच इमारतीचा भार पेलण्यास सक्षम नसल्याने इमारत अचानक कोसळली असावी व या दुर्घटनेस निव्वळ अपघात आहे असे परिभाषीत करण्यात येईल. |
| ११. | श्री.राजेंद्र भोसले शाखा अभियंता, उपअभियंता क्र.१चा [अतिरिक्त कार्यभार] / ई-२ विभाग, मुं.ई.दु.व पु. मंडळ | २७/०५/१६ | १] विधानसभा व विधानपरिषद सदस्य निधीमधील अंर्तभूत केलेल्या मंजूर कामाविषयी माहिती विशद केली आहे.<br>२] दुरूस्ती काम प्रगतीपथावर असताना इमारतीची पहाणी केल्यावर असे दिसून आले की इमारतीमधील भा/र यांनी त्यांच्या राहत्या खोल्या रिकाम्या केल्या होत्या.<br>३] संबंधीत कंत्राटदारास काळजीपूर्वक काम करण्यास व सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेण्याच्या सुचना वेळोवेळी देण्यात आल्या.<br>४] इमारतीसमोर कॉंक्रीट रस्त्याचे जे.सी.बी. वापरुन खोदकाम करण्यात येत होते, त्यामुळे आजूबाजूच्या इमारतींना हादरे बसल्याचे जाणवत होते असे स्थानिक रहिवाशी यांनी इमारत कोसळण्याचे सांगितले.<br>७] इमारतीमधील लाकडी खांब, तुळया, भार वाहक भिंत ज्या उघड डोळयांनी दिसत नव्हता तो भाग ठिसूळ व कमकुवत झाल्याने तसेच इमारतीचा भार पेलण्यास सक्षम नसल्याने इमारत ही अचानक कोसळली असावी व या दुर्घटनेस अपघात आहे असे परिभाषीत करण्यात येईल. |

६] **वरीलप्रमाणे चौकशी करुन खालील बाबी निर्दशनास आल्या आहेत :-**

[बिम्स] या मोठया प्रमाणात कुजलेल्या आणि सडलेल्या स्थितीत होत्या, हे लाकडी खांब आणि तुळया इमारतीचे वजन पेलणारे स्ट्रक्चरल मेंबर्स असल्यामुळे आणि ते कुजून व सडून गेल्यामुळे त्यांची वजन पेलण्याची क्षमता कमी झाल्याने इमारत कोसळली असावी असा निष्कर्ष सर्वसाधारणपणे निघतो.

**६.२:-** मग सदर लागडी खांब व तुळया इतक्या खराब अवस्थेत येईपर्यंतच्या काळात इमारतीची दुरुस्ती का करण्यात आली नाही ? असा प्रश्न उपस्थित होतो. सर्व संबंधीतांकडून या बाबतीत विचारणा केली असता त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार खालील बाब निदर्शनात आली आहे.

"वर नमूद इमारतींच्या जिन्याकडील भाग सोडून इतर भागात लाकडी खांब तुळया व भारवाहक भिंतीचा दर्शनी भाग वरुन धोकादायक जाणवले नाही. बहुतांश ठिकाणी भिंतीवर टाईल्स लावण्यात आल्या होत्या त्यामुळे त्या आतील लाकडी तुळया व खांबांची तसेच भिंतीची नेमकी दुरावस्था लक्षात आली नसावी".

**६.३:-** तांत्रिकदृष्टया लाकडी खांब व तुळया यांची दुरावस्था व भारवाहक भिंती आतून ठिसूळ झाल्या असाव्यात या व्यतिरिक्त इतर कोणतेही कारण ही इमारत कोसळण्यासाठी असू शकेल असा कोणताही पुरावा सकृत दर्शनी दिसून येत नाही.

**६.४:-** वरील कारण मीमांसा लक्षात घेता इमारतीचे लाकडी खांब व तुळया कुजून व ठिसूळ झालेल्या भिंती ज्या दर्शनी भागात दिसत नाही आणि इमारत अकस्मातपणे कोसळली असा अनुमान निघतो.

**६.५:-** सर्व संबंधिताच्या लेखी जबाबात त्यांनी असा ही उल्लेख केला आहे की, इमारत समोर काँक्रीट रस्त्याचे जे.सी.बी. या मशीनीचा वापर करुन खोदकाम सुरु होते त्यामुळे आजुबाजूच्या इमारतींना हादरा बसल्याचे जाणवत होते, कदाचित यामुळे देखिल जुन्या इमारतीस काही प्रमाणात धक्का बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**६.६:-** या ठिकाणी नमुद करण्यात येते की, जुन्या इमारतींच्या सर्वेक्षणाच्या वेळी दुरुती

27/c

visual inspection and therefore its stability or settlement of foundation or other detoriation if takes place in that particular portion cannot be predicted or ascertained and therefore some time there is likely possibility for collapse, due to unequal settlement of foundation) त्यामुळे इमारत कोसळण्याचा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरिल इमारत कोसळण्याचे हे देखिल एक कारण असू शकते.

७] <u>निष्कर्ष</u> **[म्हणजेच, सदर इमारत कोसळण्याचा दुर्घटनेस जबाबदार कोण ?]**

**७.१:-** उपकर प्राप्त इमारतीची दरवर्षी पावसाळयापूर्वी व भाडेकरु/रहिवाश्यांच्या तक्रारीनुसार पहाणी केली जाते व आवश्यकतेप्रमाणे उपाय-योजना देखिल करण्यात येते. जसे की, टेकू लावणे, धोकादायक भाग पाडणे, दुरुस्ती काम हाती घेणे आवश्यकतेनुसार भाडेकरु/रहिवाशी यांना व्हेकेशन नोटिस देऊन, मंडळाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करुन पर्यायी राहण्याची तात्पुरती जागा देणे अशी अनुषांगिक कार्यवाही करण्यात येते.

**७.२:-** उपरोक्त इमारतीची पाहणी केल्यानंतर दि.०३/०२/२०१६ रोजी टेकू लावणे व धोकादायक भागाचे पाडकाम करणा-या कंत्राटदारास आवश्यक सूचना व कार्यादेश देऊन धोकादायक भागास टेकू लावणे, जिना लगत फुगलेली भिंती पाडणे अश्या सुरक्षिततेच्या उपाय-योजना करण्यात आल्या होत्या. ही वस्तुस्थिती आहे, या व्यतिरिक्त इमारतीतील इतर भाग धोकादायक असल्याचे दिसत नव्हता.

**७.३:-** इमारतीतील धोकादायक भागाची पाहणी करुन त्या भागाची वि.स.स. व वि.प.स. म्हणजेच आमदार निधी मार्फत दुरुस्ती काम देखिल सुरु करण्यात आले होते.

**७.४:-** इमारतीचे दर्शनी आवरण तोडून स्ट्रक्चरल मेंबर्स उघड करुन तांत्रिक दृष्टया पाहणी करणे वगैरे ही बाब व्यवहार्य होत नाही, अश्यावेळी दर्शनी भागाची पाहणी, भाडेकरु/रहिवाशी यांनी दिलेली माहिती यावरच अवलंबून रहावे लागते व तदनुसार व त्यावेळील परिस्थितीनुसार इमारतीत दुरुस्तीचे काम करुन इमारतीस सुस्थितीस आणण्याचा

७.५:- उपरोक्त नमूद केलेल्या सर्व बाबींच्या साकल्याने विचार करता, मंडळाचे अधिकारी जुन्या उपकर प्राप्त इमारतीचा सुरक्षितते करीता सतत, प्रयत्नशील असतात, तरी देखिल इमारत कोसळण्याची दुर्घटना होते, त्यामुळे या कोसळण्याच्या दुर्घटनेस निव्वळ अपघात (ACCIDENT) अश्या प्रकारे विश्लेषण करता येईल आणि म्हणून सदर दुर्घटनेसाठी कोणास एका व्यक्ति किंवा व्यक्ति समूहास जबाबदार धरणे योग्य होणार नाही असे माझे चौकशी अंती अभिप्राय सादर करीत आहे.

या अहवाला सोबत वरील इमारतीशी संबंधित कागदपत्रे तसेच संबंधीतांचे नोंदविलेले जबाब जोडण्यात आले आहेत.

माहितीव अवलोकनार्थ सादर.

सोबत :- संबंधित कागदपत्रे.

**उपमुख्य अभियंता [परिमंडळ-३]**
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

① 3/c

श्री.सलीम ए. खान
तर्फे मे.इगल कंस्ट्रक्शन, मुंबई
दिनांक :- ०६/०५/२०१६

जबाब

**विषय :-** इमारत क्र. **१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत हि तळ +३ मजल्यांची भारवाहक भिंती, लाकडी खांब, तुळया अशा पारंपारीक पध्दतीत बनलेली होती. सदर इमारतीच्या कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व.पु. मंडळ कार्यालयात आम्हाला बोलविले असता मी, श्री.सलीम ए. खान, वय वर्षे ६३ राहणार भायखळा खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

या इमारतीत टेकू लावणे व आवश्यकत्या ठिकाणी तोडकाम करण्याकरीता कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.५७४, दि.०३/०२/२०१६ अन्वये मे.इगल कंस्ट्रक्शन, मुंबई हयांना कार्यादेश दिले. मे.इगल कंस्ट्रक्शनचे मालक श्री.दाऊद इसम खान हे माझे जावई आहेत ते सहकुटुंब बाहेरगावी गेले असल्या कारणाने त्यांच्या वतीने सदर जबाब मी नोंदवित आहे. विषयांकित इमारतीच्या धोकादायक भागात टेकू लावणे व तोडकाम करण्या करीता माझा प्रत्यक्ष सहभाग होता व त्या कामावर माझी देखरेख होती. सदर कार्यादेश दिल्यानंतर ताबडतोब नकाशात दर्शविल्या प्रमाणे तळमजल्यावरील जिना, स्वयंपाकघर, पहिल्या, दुस-या व तिस-या मजल्यावरील जिना, पॅसेज, संडास-बाथरुम या ठिकाणी मे.इगल कंस्ट्रक्शन यांनी दि.०३/०२/२०१६ ते ०८/०२/२०१६ या दरम्यान टेकू लावले. तसेच इमारतीच्या जिन्या लगतची पहिल्या, दुस-या व तिस-या मजल्यावरील धोकादायक अवस्थेत असलेला भिंतीचा भाग काढुन टाकला.

सदर इमारतीच्या तळ मजल्यावर हॉटेल होते, या हॉटेलच्या भिंतींना टाईल्स लावल्याचे आढळले तसेच छताला फॉल्ससिलिंग असल्यामुळे तेथे धोकादायक भाग दिसून आला नाही. तसेच पहिल्या व दुस-या मजल्यावर प्रथम दर्शनी भागात धोकादायक भाग दिसून न आल्याने त्या ठिकाणी टेकू लावण्यात आले नाही व पाडकामही करण्यात आले नाही.

उपरोक्त केलेल्या कामानंतर मे.इगल कंस्ट्रक्शन मार्फत कंत्राटदार, कामगार वा इतर कोणीही व्यक्ती त्या इमारतीमध्ये पुन्हा गेलेला नाही.

उपरोक्त जबाब मी, विषयांकित इमारतीच्या चौकशीच्या अनुषंगाने राजीखुशीने, नशा-पाणी न करता कुणाच्याही दबावाखाली न येता आज दि.०६/०५/२०१६ रोजी दिला आहे.

33/c

श्री.सुनिल सुंदर शेट्टी
सदाशिव बिल्डिंग नं.६१,
२री गल्ली, कामाठीपुरा, ३रा मजला,
खोली क्र.१३,१४,१५,१६,
मुंबई. मो.नं.:-९८६७५८९३५७
दिनांक :-०७/०५/२०१६

<u>जबाब</u>

**विषय :-** इमारत क्र. **१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग"**, कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.०७/०५/२०१६ रोजी मला बोलविले असता मी, श्री.सुनिल सुंदर शेट्टी, वय वर्षे ५० राहणार सदाशिव बिल्डिंग नं.६१, २री गल्ली, कामाठीपुरा, ३रा मजला, खोली क्र.१३,१४,१५,१६, मुंबई. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ या इमारतीमध्ये तळमजल्यावर माझी आई श्रीमती.रमाबाई सुंदर शेट्टी हिच्या नांवे न्यु राष्ट्रीश लंच होम व बार या नावाचे हॉटेल होते. सदर हॉटेल माझे वडील पूर्वी पासून चालवायचे व हे हॉटेल साधारणत: ७० ते ८० वर्षांपासून होते. सदर हॉटेलचे पॉवर ऑफ अॅटर्नी व गुमास्ता माझे नांवे आहे व सद्यस्थितीत हे हॉटेल मी साधारणत: सन १९८७ पासून चालवित होतो. माझ्या हॉटेल मधील सर्व भिंतीना टाईल लावले होते व छताला सुमारे सन १९८३ साली फॉल सिलिंगचे काम केले होते. १९८७ साला पासून माझ्या हॉटेल मधल्या भागाचे म्हाडातर्फे किंवा आमच्यामार्फत कुठल्याही प्रकारची दुरुस्ती केली नव्हती.

माहे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात म्हाडाचे काही अधिकारी आमच्या इमारतीची पहाणी करण्यासाठी आले व त्यांनी इमारतीतील जिन्या लगतची फुगलेली धोकादायक अवस्थेतील पहिला ते तिसरा मजला पर्यंतची भिंत काढण्याची व धोकादायक भागास टेकू लावण्यास सांगितले व त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये काम केले, तदनंतर दि.११/०४/२०१६ रोजी म्हाडाचे अधिकारी, वास्तुशास्त्रज्ञ, कंत्राटदार श्री.मोहन शिंदे हे आमच्या इमारतीमध्ये आले व त्यांनी मला इमारतीमध्ये

[illegible] आहेत असे सांगितले

४] मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील तळ मजला सोडून पहिल्या मजला ते तिस-या मजल्या पर्यंत बाहेरील भिंतीच्या गिलावा करणे व इमारतीच्या छताच्या जल-रोधीकरण काम (Terrace Water Proofing Work)

उपरोक्त कामांपैकी दि.३०/०४/२०१६ पर्यंत खालीलप्रमाणे कामे करण्यात आली.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या भिंतीतील लाकडी खांब व बीम काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी काम लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते. मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते. सदर काम करीत असताना अधुन-मधुन दुरुस्ती कामा करीता मंडळाने नेमलेले वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मीन भंडारे हे देखरेख करण्या करीता येत होते. त्यांच्या देखरेखीखाली व सुचने नुसार काम करण्यात येत होते.

उपरोक्त दुरुस्ती काम करावयाच्या कामा व्यतीरिक्त माझ्या ताब्यात असलेल्या जागेत सकृत दर्शनी धोकादायक भाग दिसून येत नव्हता.

मी, दिनांक फेब्रुवारी २०१६ मध्ये जागा रिकामी केली व वर नमूद पत्यावर तात्पुरत्या स्वरुपात राहायला गेलो, तथापि त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे जाणे-येणे चालु होते. इमारतीचे दुरुस्ती काम चालु असताना आमच्या इमारतीच्या समोरील डांबरी व त्या खालील काँक्रीट रस्त्याचे जेसीबीने खोदकाम चालु होते. या रस्त्याच्या कामामुळे आमच्या इमारतीस हादरे बसत असल्याचे जाणवत होते.

उपरोक्त जबाब मी, राजी-खुशीने नशा-पाणी न करता व कुणाच्या ही दवाबाखाली न येता लिहून देत आहे.

उपरोक्त जबाब मी उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ यांना हिंदी भाषेत दिला व सदर जबाब मराठी भाषेत नोंदविण्यात आला व तो त्यांनी मला वाचून व समजावून सांगितले व तो मला पूर्णपणे समझला आहे म्हणुन मी त्या जबाबावर स्वाक्षरी करीत आहे.

7/5/2016

[श्री.सुनिल सुंदर शेट्टी]

4/3 DyCE/III/MBR[illegible]B
copy

35/C

श्री.मोहम्मद हनीफ अब्बुल रऊफ,
अरबगल्ली सुलेमान टॉवर,
फौजीया हॉस्पीटल जवळ, रुम
नं.१६०१, १६वा मजला, ग्रंटरोड,
मुंबई-०८.
मो.नं.:-९८२०६४२४९१
दिनांक :- ०७/०५/२०१६

<u>जबाब</u>

**विषय :-** इमारत क्र. **१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.०७/०५/२०१६ रोजी मला बोलविले असता मी, श्री.मोहम्मद हनीफ अब्बुल रऊफ, वय वर्षे ४८ राहणार अरबगल्ली सुलेमान टॉवर, फौजीया हॉस्पीटल जवळ, रुम नं.१६०१, १६वा मजला, ग्रंटरोड, मुंबई-०८. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ या इमारतीमधील संपूर्ण तिसरा मजला भाडेपावती प्रमाणे मोहम्मद हनीफ अब्दुल रऊफ शेख, खोली क्र.४, तीसरा मजला, गुलमोहर बिल्डिंग, कामाठीपुरा, मुंबई माझ्या ताब्यात होता. माझ्या खोलीमध्ये साधारणत: ४-५ फुट उंची पर्यंत भिंतीवर टाईलस लावलेल्या होत्या.

माहे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात म्हाडाचे काही अधिकारी आमच्या इमारतीची पहाणी करण्यासाठी आले व त्यांनी इमारतीतील जिन्या लगतची फुगलेली धोकादायक अवस्थेतील पहिला ते तिसरा मजला पर्यंतची भिंत काढण्याची व धोकादायक भागास टेकू लावण्यास सांगितले व त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये काम केले, तदनंतर दि.११/०४/२०१६ रोजी म्हाडाचे अधिकारी, वास्तुशास्त्रज्ञ, कंत्राटदार श्री.मोहन शिंदे हे आमच्या इमारतीमध्ये आले व त्यांनी मला इमारतीमध्ये दुरुस्तीची खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत असे सांगितले.

१] जिन्या लगत भिंतीची वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्याच्या भिंतीतील लाकडी खांब काढुन त्याऐवजी लोखंडी खांब बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे लादी-कोबा-लादी काम करणे.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या भिंतीतील लाकडी खांब व बीम काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी काम लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते. मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते. सदर काम करीत असताना अधुन-मधुन दुरुस्ती कामा करीता मंडळाने नेमलेले वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मीन भंडारे हे देखरेख करण्या करीता येत होते. त्यांच्या देखरेखीखाली व सुचने नुसार काम करण्यात येत होते.

उपरोक्त दुरुस्ती काम करावयाच्या क्षेत्रा व्यतीरिक्त माझ्या ताब्यात असलेल्या जागेत सकृत दर्शनी धोकादायक भाग दिसून येत नव्हता.

मी, दिनांक फेब्रुवारी २०१६ मध्ये जागा रिकामी केली व वर नमूद पत्यावर तात्पुरत्या स्वरुपात राहायला गेलो, तथापि त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे जाणे-येणे चालु होते. इमारतीचे दुरुस्ती काम चालु असताना आमच्या इमारतीच्या समोरील डांबरी व त्या खालील काँक्रीट रस्त्याचे जेसीबीने खोदकाम चालु होते. या रस्त्याच्या कामामुळे आमच्या इमारतीस हादरे बसत असल्याचे जाणवत होते. आमची इमारत कोसळल्याच्या वेळी मी, इमारतीमध्ये नव्हतो इमारत कोसळल्याचे मला समझल्यानंतर मी साधारण दु.२.००-२.३० च्या सुमारास मी इमारतीकडे गेलो असता राजूजी मानाजी रोड या रस्त्यावर आमची इमारत त्यामध्ये कोसळल्याचे दिसले, त्यामध्ये दुरुस्त केलेला भाग कोसळा नव्हता. जसे की, नव्याने बसविण्यात आलेल्या लोखंडी खांब व तुळया.

उपरोक्त जबाब मी, राजी-खुशीने नशा-पाणी न करता व कुणाच्या ही दबाबाखाली न येता लिहून देत आहे.

उपरोक्त जबाब मी उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ यांना हिंदी भाषेत दिला व सदर जबाब मराठी भाषेत नोंदविण्यात आला व तो त्यांनी मला वाचून व समजावून सांगितले व तो मला पूर्णपणे समझला आहे म्हणुन मी त्या जबाबावर स्वाक्षरी करीत आहे.

M.Ha 7/5/2016

[श्री.मोहम्मद हनीफ अब्बुल रऊफ]

# MUNIRA PATEL / KARIM PATEL / ISMAIL PATEL

Mr. / Mrs. Mohd Hanif Abdul Rauf Shaikh. Receipt No. 217

Address Room No 4, 3rd Flr, Gul Mahal Bldg, R.S. Nimkar Rd, Mumbai 400008. Date: 23-12-2015

Shop / Flat 4

We have given you the above mentioned premise for **Rent at the** condition mentioned on the Reverse of receipt

**From** 01-07-2015 **To** 31-12-2015.

@ 1125/= x 6 mths.

July, Aug, Sept, Oct, Nov & Dec 2015

| | Rs. | P |
|---|---|---|
| Rent | 6750/00 | |
| Municipal Taxes | Will be extra | |
| Repair Cess | | |
| **TOTAL Rs.** | 6750/00 | |

(Subject to condition on the reverse)

Received without Prejudice.

Receiver Sign.

M. Hanif.
7/5/2016

37/c

(VI) ई.ए.सी.ई./ मंडळ/ copy

41/c

श्रीमती.शबाना रेहमत जमादार,
५०-बी, क्लेअर रोड. धनकासन
बिल्डिंग, [आयेशा बिल्डिंग],
रुम नं.३१, ३रा मजला, भासखळा,
मुंबई-०८.
मो.नं.:-९३२३३९३५३२
दिनांक :- ०७/०५/२०१६

<u>जबाब</u>

**विषय :-** इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग"**, कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.०७/०५/२०१६ रोजी मला बोलविले असता मी, श्रीमती.शबाना रेहमत जमादार, वय वर्षे ३६ राहणार ५०-बी, क्लेअर रोड. धनकासन बिल्डिंग, [आयेशा बिल्डिंग], रुम नं.३१, ३रा मजला, भासखळा, मुंबई-०८. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ या इमारतीमधील संपूर्ण दुसरा मजला भाडेपावती प्रमाणे श्रीमती.शबाना रेहमत जमादार, खोली क्र.३, दुसरा मजला, गुलमोहर बिल्डिंग, कामाठीपुरा, मुंबई-८ माझ्या ताब्यात होता. माझ्या खोलीमध्ये साधारणत: ५-६ फुट उंची पर्यंत भिंतीवर टाईलस लावलेल्या होत्या.

माहे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात म्हाडाचे काही अधिकारी आमच्या इमारतीची पहाणी करण्यासाठी आले व त्यांनी इमारतीतील जिन्या लगतची फुगलेली धोकादायक अवस्थेतील पहिला ते तिसरा मजला पर्यंतची भिंत काढण्याची व धोकादायक भागास टेकू लावण्यास सांगितले व त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये काम केले, तदनंतर दि.११/०४/२०१६ रोजी म्हाडाचे अधिकारी, वास्तुशास्त्रज्ञ, कंत्राटदार श्री.मोहन शिंदे हे आमच्या इमारतीमध्ये आले व त्यांनी मला इमारतीमध्ये दुरुस्तीची खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत असे सांगितले.

१] जिन्या लगत भिंतीची वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्याच्या भिंतीतील लाकडी खांब काढुन त्याऐवजी लोखंडी खांब बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे

उपरोक्त कामांपैकी दि.३०/०४/२०१६ पर्यंत खालीलप्रमाणे कामे करण्यात आली.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या भिंतीतील लाकडी खांब व बीम काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी काम लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते. मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते. सदर काम करीत असताना अधुन-मधुन दुरुस्ती कामा करीता मंडळाने नेमलेले वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मीन भंडारे हे देखरेख करण्या करीता येत होते. त्यांच्या देखरेखीखाली व सुचने नुसार काम करण्यात येत होते.

उपरोक्त दुरुस्ती काम करावयाच्या क्षेत्रा व्यतीरिक्त माझ्या ताब्यात असलेल्या जागेत सकृत दर्शनी धोकादायक भाग दिसून येत नव्हता.

मी, दिनांक फेब्रुवारी २०१६ मध्ये जागा रिकामी केली व वर नमूद पत्यावर तात्पुरत्या स्वरुपात राहायला गेले, तथापि त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे जाणे-येणे चालु होते. इमारतीचे दुरुस्ती काम चालु असताना आमच्या इमारतीच्या समोरील डांबरी व त्या खालील कॉंक्रीट रस्त्याचे जेसीबीने खोदकाम चालु होते.

उपरोक्त जबाब मी, राजी-खुशीने नशा-पाणी न करता व कुणाच्या ही दवाबाखाली न येता लिहून देत आहे.

उपरोक्त जबाब मी उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ यांना हिंदी भाषेत दिला व सदर जबाब मराठी भाषेत नोंदविण्यात आला व तो त्यांनी मला वाचून व समजावून सांगितले व तो मला पूर्णपणे समझला आहे म्हणुन मी त्या जबाबावर स्वाक्षरी करीत आहे.

SRShaikh
7/5/2016

[श्रीमती.शबाना रेहमत जमादार]

# MUNIRA PATEL / KARIM PATEL / ISMAIL PATEL

Mr. / Mrs. Shabana Rehmat Jamadar — Receipt No 214

Address Room No. 3, 2nd Flr. Gulmahal Bldg, R. S. Nimkar Rd, Mumbai 400 008. — Date : 21-12-2015

Shop / Flat 3

We have given you the above mentioned premise for Rent at the condition mentioned on the Reverse of receipt

From 01-08-2015 To 31-12-2015
@ 1125/- x 5 mths
Aug, Sept, Oct, Nov, & Dec. 2015
Cheque No 008162 (BOI)
Dtd 21-12-2015

| | Rs. | P |
|---|---|---|
| Rent | 5625/00 | |
| Municipal Taxes | will be extra | |
| Repair Cess | | |
| TOTAL Rs. | 5625/00 | |

(Subject to condition on the reverse)

[signature] Receiver Sign.

[signature] 7/5/2016

43/c

45/c

भारत सरकार

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण
भारत सरकार
Unique Identification Authority of India
Government of India

नोंदविण्याचा क्रमांक / Enrollment No 1218/61074/4..814

To,
शबाना रहमत जमदार
Shabana Rahamat Jamadar
50/b Dhan Castle Building, 3rd Floor, Room No. 31
Clare Road
Light Of India Hotel Byculla
Mumbai Central
Mumbai Central Mumbai Mumbai
Maharashtra 400008

11/06/2013

Ref: 152 26H / 293008 / 293326 / P

SH187748242FT

आपला आधार क्रमांक / Your Aadhaar No. :

## 9229 2836 2015

आधार - सामान्य माणसाचा अधिकार

भारत सरकार
Government of India



शबाना रहमत जमदार
Shabana Rahamat Jamadar
जन्म वर्ष / Year of Birth : 1982
स्त्री / Female

**9229 2836 2015**

आधार - सामान्य माणसाचा अधिकार

SKShaikh
7/5/2016

47

# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका)

बेस्ट भवन, पो.बॉ. नं. १९२, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

**प्रभाग कार्यालयाचा पत्ता :**

हेल्प डेस्क फोन नं.२३०२६७४९

नाव :
SHABANA RAHAMAT JAMADAR

**देयक पाठविण्याचा पत्ता :**
FLAT NO.3,FLOOR-2ND,12A,GULMAHAL BUILDING,R S NIMKAR MARG,KAMATHIPURA,MUMBAI CENTRAL,MUMBAI-400008

**वीज पुरवठ्याचा पत्ता :**
FLAT NO.3,FLOOR-2ND,12A,GULMAHAL BUILDING,R S NIMKAR MARG,KAMATHIPURA,MUMBAI CENTRAL,MUMBAI-400008

देयक महिना :Apr-2016 देयक दिनांक : 21/04/2016 देयक क्र. : 454013170716

| | | | |
|---|---|---|---|
| पुस्तक पृष्ठ क्र. | 839073 | ग्राहक क्र. | 839-073-005*5 |
| चक्र | 06 | करार खाते क्र. | 2272054 |
| पुरवठ्याचा प्रकार | 1P | देयकाचा कालावधी | 09/03/2016 - 06/04/2016 |
| संधारणा क्र. | 25276-X-X | | |
| यंत्रणा क्र. | 0033953 | दर प्रवर्ग | LT I |
| मंजूर भार | 0.370 | ग्राहक प्रवर्ग | RESIDENTIAL |
| अनामत रक्कम जमा | 300.00 | प्रभाग | D |

मागील देयकाची प्राप्त रक्कम ₹ 1040.00 — मागील रक्कम प्राप्त दिनांक 12/04/2016

| चालू देयकाची रक्कम ₹ | मागील बाकी ₹ | देय दिनांक* | देय दिनांक पूर्वी रक्कम ₹ | देय दिनांका नंतर रक्कम ₹** |
|---|---|---|---|---|
| 1135.48 | 1.30 | 13/05/2016 | 1130.00 | 1159 |

*देय दिनांक फक्त चालू महिन्याच्या देयकाच्या रक्कमेवर ग्राह्य आहे ** थकबाकी असल्यास व्याज आकारले जाईल

| महत्वाचे संपर्क क्रमांक | वीज पुरवठा खंडित तक्रारी करीता | वीज देयक तक्रारी संबंधी | वीज चोरी / अनधिकृत वापर | मुख्य/फॉल्ट कंट्रोल |
|---|---|---|---|---|
| | IVRS-22843939 | 23026749/23026757 | South - 22814996 | [illegible] |

**अंतर्गत गाऱ्हाणी निवारण कक्ष**

[illegible] विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, [illegible] २३०९२३६५, २३०२६७६१,
ई-मेल :igrcccdward@bestundertaking.com

**ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंच**

...मजला, विस्तारीत इमारत, अॅकामाडंशन रोड, कुलाबा, मुंबई - ४०० ००१,
संकेत स्थळ : www.cgrfbest.org.in
ई मेल : dacgrf@bestundertaking.com

**आपल्या विभागातील वीजदेयक भरणा केंद्रे**

- कामाठीपुरा : पंचशिल इमारतीसमोर, मानाजी राजू मार्ग, मुंबई ४०० ००८.
- ताडदेव : [illegible]
- नाना चौक : जबनपुत्र कंम्पाउंड, महानगरपालिका 'ड' विभाग, नाना चौक, मुंबई ४०० ००७
- ग्रॅन्ट रोड : सुपर सिनेमाजवळ, शौकत अली मार्ग, मुंबई.
- गोल देऊळ : संत सेना महाराज मार्ग, दुसरा कुंभारवाडा, मुंबई ४०० ००४.
- [illegible] ४०० ००४.
- वाळकेश्वर : बेस्ट हाउस, वाळकेश्वर बस स्थानक, वाळकेश्वर.

**ग्राहकांसाठी संदेश**

ग्राहकांना विनंती कि वीजदेयकाचे प्रदान करताना त्यांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल वीजदेयकाच्या मागील पृष्ठावरील नियोजित ठिकाणी नमूद करावा.

**मागील वीजेचा वापर**

स्तंभ आलेख - युनिट्स (kWh) महिना

meter No-E062386

| युनिट्स | महिना |
|---|---|
| 114 | Mar-16 |
| 77 | Feb-16 |
| 80 | Jan-16 |
| 133 | Dec-15 |
| 141 | Nov-15 |
| 162 | Oct-15 |
| 169 | Sep-15 |
| 170 | Aug-15 |
| 191 | Jul-15 |
| 184 | Jun-15 |
| 174 | May-15 |

युनिटस वापर kWh

| | |
|---|---|
| Apr-16 | 166 |
| Apr-15 | 111 |

**महत्वाच्या सूचना:**

- We are shortly starting SMS service for billing related alerts. Mobile no. 9833295834 is furnished against your consumer no. 839073005 . For correction, if any, please visit your nearest Customer Care Dept. or contact our call center on 22843939 or log on to www.bestundertaking net
- Prompt payment discount of Rs. 9.44 will be given if payment is made on / before 02/05/2016
- Your Electricity bill amount is rounded off to lower Rs.10/- amount for convenience at Bill Collection Centers. The difference amount will be adjusted in your next Electictiy bill.
- As per notifications received from Govt. of Maharashtra Electricity duty rates are revised from the Billing Month of April 2015 and Maharashtra Tax on sale of electricity rates are revised from 01.04.2015.

सु.पा. मकवाना
(सुरेश पा. मकवाना)
मुख्य अभियंता ग्राहक सेवा

योग्य व अचूक वीजमापनासाठी बेस्ट मीटरचा ब्रँच कटआउट काढू नका किंवा एमसीसीबी बंद ठेऊ नका, ही विनंती.

079609*06.05.2016*067*ad

83907300055*00001130.00*0

Selhukl
7/5/2016

49/c

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA



शबाना रहमत जमदार
Shabana Rahamat Jamadar
जन्म वर्ष/YoB:1982
महिला Female

9229 2836 2015

आधार - सामान्य माणसाचा अधिकार

भारत निवडणूक आयोग
ओळखपत्र
ELECTION COMMISSION OF INDIA
IDENTITY CARD

XIC4703443



मतदाराचे नांव : शबाना रहमत जमादार
Elector's Name : Shabana Rahmat Jamadar
वडिलांचे नांव : रहमत जमादार
Father's Name : Rahmat Jamadar
लिंग / Sex : स्त्री / FEMALE
जन्म तारीख /Date of Birth : 21/01/1982

Sd/-
7/5/2016

⑤ 51/२

श्री.रेहमत ऐनल्ल जमादार,
५०-बी, क्लेअर रोड. धनकासन
बिल्डिंग, [आयेशा बिल्डिंग],
रुम नं.३१, ३रा मजला, भासखळा,
मुंबई-०८.
मो.नं.:-९८२०५८७९११
दिनांक :- ०७/०५/२०१६

जबाब

**विषय :-** इमारत क्र. **१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणें कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.०७/०५/२०१६ रोजी मला बोलविले असता मी, श्री.रेहमत ऐनल्ल जमादार, वय वर्षे ४३ राहणार ५०-बी, क्लेअर रोड. धनकासन बिल्डिंग, [आयेशा बिल्डिंग], रुम नं.३१, ३रा मजला, भासखळा, मुंबई-०८. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ या इमारतीमधील संपूर्ण पहिला मजला भाडेपावती प्रमाणे श्री.रेहमत ऐनल्ल जमादार, खोली क्र.२, १ला मजला, गुलमोहर बिल्डिंग, कामाठीपुरा. मुंबई माझ्या ताब्यात होता. माझ्या खोलीमध्ये साधारणत: ५-६ फुट उंची पर्यंत भिंतीवर टाईलस लावलेल्या होत्या.

माहे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात म्हाडाचे काही अधिकारी आमच्या इमारतीची पहाणी करण्यासाठी आले व त्यांनी इमारतीतील जिन्या लगतची फुगलेली धोकादायक अवस्थेतील पहिला ते तिसरा मजला पर्यंतची भिंत काढण्याची व धोकादायक भागास टेकू लावण्यास सांगितले व त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये काम केले, तदनंतर दि.११/०४/२०१६ रोजी म्हाडाचे अधिकारी, वास्तुशास्त्रज्ञ, कंत्राटदार श्री.मोहन शिंदे हे आमच्या इमारतीमध्ये आले व त्यांनी मला इमारतीमध्ये दुरुस्तीची खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत असे सांगितले.

१] जिन्या लगत भिंतीची वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्याच्या भिंतीतील लाकडी खांब काढुन त्याऐवजी लोखंडी खांब बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे

उपरोक्त कामांपैकी दि.३०/०४/२०१६ पर्यंत खालीलप्रमाणे कामे करण्यात आली.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या भिंतीतील लाकडी खांब व बीम काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी काम लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते. मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते. सदर काम करीत असताना अधुन-मधुन दुरुस्ती कामा करीता मंडळाने नेमलेले वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मीन भंडारे हे देखरेख करण्या करीता येत होते. त्यांच्या देखरेखीखाली व सुचने नुसार काम करण्यात येत होते.

उपरोक्त दुरुस्ती काम करावयाच्या क्षेत्रा व्यतीरिक्त माझ्या ताब्यात असलेल्या जागेत सकृत दर्शनी धोकादायक भाग दिसून येत नव्हता.

मी, दिनांक फेब्रुवारी २०१६ मध्ये जागा रिकामी केली व वर नमूद पत्यावर तात्पुरत्या स्वरुपात राहायला गेलो, तथापि त्यानंतरही सदर इमारतीमध्ये माझे जाणे-येणे चालु होते. इमारतीचे दुरुस्ती काम चालु असताना आमच्या इमारतीच्या समोरील डांबरी व त्या खालील काँक्रीट रस्त्याचे जेसीबीने खोदकाम चालु होते. या रस्त्याच्या कामामुळे आमच्या इमारतीस हादरे बसत असल्याचे जाणवत होते. आमची इमारत कोसळल्याच्या वेळी मी, इमारतीमध्ये नव्हतो इमारत कोसळल्याचे मला समझल्यानंतर मी साधारण दु.३.००-३.३० च्या सुमारास मी इमारतीकडे गेलो असता राजूजी मानाजी रोड या रस्त्यावर आमची इमारत त्यामध्ये कोसळल्याचे दिसले, त्यामध्ये दुरुस्त केलेला भाग कोसळा नव्हता. जसे की, नव्याने बसविण्यात आलेल्या लोखंडी खांब व तुळया.

उपरोक्त जबाब मी, राजी-खुशीने नशा-पाणी न करता व कुणाच्या ही दवाबाखाली न येता लिहून देत आहे.

उपरोक्त जबाब मी उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ यांना हिंदी भाषेत दिला व सदर जबाब मराठी भाषेत नोंदविण्यात आला व तो त्यांनी मला वाचून व समजावून सांगितले व तो मला पूर्णपणे समझला आहे म्हणुन मी त्या जबाबावर स्वाक्षरी करीत आहे.

(signature) 7/5/2016

[श्री.रेहमत ऐनल्ल जमादार]

# MUNIRA PATEL / KARIM PATEL / ISMAIL PATEL

Mr. / ~~Mrs.~~ Rehmat Iqbal Jamadar — Receipt No. 213

Address: Room No 2 1st Flr, Gulmahal Bldg, R.S. Nimkar Rd, Mumbai 400008 — Date 21-12-2015

~~Shop~~ Flat 2

We have given you the above mentioned premise for Rent at the condition mentioned on the Reverse of receipt

From 01-08-2015 To 31-12-2015.
@ 1125 X 5 mths
Aug, Sept, Oct, Nov, & Dec 2015

Cheque No 008161 (BOI)
~~Dtd~~ 21-12-2015,

| | Rs. | P |
|---|---|---|
| Rent | 5625/00 | |
| Municipal Taxes | will be extra | |
| Repair Cess | / | |
| TOTAL Rs. | 5625/00 | |

(Subject to condition on the reverse)

Receiver Sign.

Rehmat
7/5/2016

53/c

55/c

[redacted]



रहमत जमदर

Rahamat Jamadar

जन्म वर्ष/YoB:1973

पुरुष Male

9605 8933 5962

आधार - सामान्य माणसाचा अधिकार

भारत निवडणूक आयोग
ओळखपत्र
ELECTION COMMISSION OF INDIA
IDENTITY CARD

XIC4703450



| | |
|---|---|
| मतदाराचे नांव | : रहमत आयनल जमादार |
| Elector's Name | : Rahamat Inal Jamadar |
| वडिलांचे नांव | : आयनल जमादार |
| Father's Name | : Inal Jamadar |
| लिंग / Sex | : पुरुष / MALE |
| जन्म तारीख /Date of Birth | : 12/11/1973 |

Rahamat
7/5/2016

57/c

भा·तीय विशिष्ट ओळख प्राधिकरण
भारत सरकार
Uni que Identification Authority of India
Government of India

न्दविण्याचा क्रमांक / Enrollment No 1218/61074/46811

To,
रहमत जमदर
Rahamat Jamadar
50/b Dhan Castle Building, 3rd Floor, Room No. 31
Clare Road
Light Of India Hotel Byculla
Mumbai Central
Mumbai Central Mumbai Mumbai
Maharashtra 400008

Ref: 59 / 30I / 107298 / 107331 / P

SH344480493FT

आपला आधार क्रमांक / Your Aadhaar No. :

**9605 8933 5962**

आधार - सामान्य माणसाचा अधिकार

7/5/2016

भारत सरकार
Government of India



रहमत जमदर
Rahamat Jamadar
जन्म वर्ष / Year of Birth : 1973
पुरुष / Male

**9605 8933 5962**

आधार - सामान्य माणसाचा अधिकार

59/

# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका)

बेस्ट भवन, पो.बॉ. नं. १९२, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

**प्रभाग कार्यालयाचा पत्ता :**

हेल्प डेस्क फोन नं.

नाव :
RAHAMAT INAL JAMADAR

देयक पाठविण्याचा पत्ता :
2,FLOOR-1,12A,GULMAHAL BUILDING,R S NIMKAR MARG,KAMATHIPURA,MUMBAI CENTRAL,MUMBAI-400008

वीज पुरवठ्याचा पत्ता :
2,FLOOR-1,12A,GULMAHAL BUILDING,R S NIMKAR MARG,KAMATHIPURA,MUMBAI CENTRAL,MUMBAI-400008

देयक महिना :Apr-2016 देयक दिनांक : 21/04/2016 देयक क्र. : 454013170715

| | | | |
|---|---|---|---|
| पुस्तक पृष्ठ क्र. | 839073 | ग्राहक क्र. | 839-073-006*7 |
| चक्र | 06 | करार खाते क्र. | 2272053 |
| पुरवठ्याचा प्रकार | 1P | देयकाचा कालावधी | 09/03/2016 - 06/04/2016 |
| संधारणा क्र. | 25276-X-X | | |
| यंत्रणा क्र. | 0424010 | दर प्रवर्ग | LT I |
| मंजूर भार | 2.000 | ग्राहक प्रवर्ग | RESIDENTIAL |
| अनामत रक्कम जमा | 300.00 | प्रभाग | D |

मागील देयकाची प्राप्त रक्कम ₹ 2300.00 — मागील रक्कम प्राप्त दिनांक 05/04/2016

| चालू देयकाची रक्कम ₹ | थकबाकी ₹ | देय दिनांक* | देय दिनांक पूर्वी रक्कम ₹ | देय दिनांक नंतर रक्कम ₹** |
|---|---|---|---|---|
| 2020.77 | 3.02 | 13/05/2016 | 2020.00 | 2064 |

*देय दिनांक फक्त चालू महिन्याच्या देयकाच्या रक्कमेवर ग्राह्य आहे ** थकबाकी असल्यास व्याज आकारले जाईल

| महत्वाचे संपर्क क्रमांक | वीज पुरवठा खंडित तक्रारी करीता | वीज देयक तक्रारी संबंधी | वीज चोरी / अनधिकृत वापर | फ्यूज/फॉल्ट कंट्रोल |
|---|---|---|---|---|
| | IVRS-22843939 | 23026749/23026757 | South 22814... | 23094242/22066... |

**अंतर्गत गाऱ्हाणी निवारण कक्ष**

सहाय्यक प्रशासकीय व्यवस्थापक,ग्राहक सेवा 'ड' विभाग ... ताडदेव बसआगार आर. एस. निमकर मार्ग ताडदेव, मुंबई – ४०० ००८.दूरध्वनी क्र. – २३०९२३६५, २३०२६७६१.
ई-मेल : igrcccdward@bestundertaking.com

**ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंच**

तळमजला, विस्तारीत इमारत, ॲकोमोडेशन ..., मुंबई – ...
संकेत स्थळ : www.cgrfbest.org.in
ई-मेल : decgrf@bestundertaking.com

**ग्राहकांसाठी संदेश**

ग्राहकांना विनंती कि वीजदेयकाचे प्रदान करताना त्यांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल वीजदेयकाच्या मागील पृष्ठावरील नियोजित ठिकाणी नमूद करावा.

**मागील वीजेचा वापर**

meter No-G015520

| महिना | युनिटस (kWh) |
|---|---|
| Mar-16 | 146 |
| Feb-16 | 189 |
| Jan-16 | 181 |
| Dec-15 | 235 |
| Nov-15 | 243 |
| Oct-15 | 244 |
| Sep-15 | 213 |
| Aug-15 | 215 |
| Jul-15 | 296 |
| Jun-15 | 264 |
| May-15 | 251 |

**युनिटस वापर kWh**

| | |
|---|---|
| Apr-16 | 266 |
| Apr-15 | 95 |

**आपल्या विभागातील वीजदेयक भरणा केंद्रे**

- कामाठीपुरा — ... इमारतीसमोर, मानाजी राजू मार्ग, मुंबई ४०० ००८.
- ताडदेव — पाडे कंम्पाउंड, ताडदेव.
- नाना चौक — ... कंम्पाउंड महानगरपालिका 'ड' विभाग नाना चौक मुंबई ४०० ००७.
- ग्रॅन्ट रोड — सुपर सिनेमाजवळ, शौकत अली मार्ग, मुंबई.
- खेतवाडी — अलंकार सिनेमाजवळ, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग,मुंबई ४०० ००४
- वाळकेश्वर — बेस्ट हाउस, वाळकेश्वर बस स्थानक, वाळकेश्वर.

**महत्वाच्या सूचना:**

- We are shortly starting SMS service for billing related alerts. Mobile no. 9619900521 is furnished against your consumer no. 839073006 . For correction, if any, please visit your nearest Customer Care Dept. or contact our call center on 22843939 or log on to www.bestundertaking.net
- Prompt payment discount of Rs. 17.05 will be given if payment is made on / before 02/05/2016
- Your Electricity bill amount is rounded off to lower Rs.10/- amount for convenience at Bill Collection Centers. The difference amount will be adjusted in your next Electicity bill.
- As per notifications received from Govt. of Maharashtra Electricity duty rates are revised from the Billing Month of April 2015 and Maharashtra Tax on sale of electricity rates are revised from 01.04.2015.

सु.पा. मकवाना
(सुरेश पा. मकवाना)
मुख्य अभियंता ग्राहक सेवा

योग्य व अचूक वीजमापनासाठी बेस्ट मीटरचा ब्रॅच कटआउट काढू नका किंवा एमसीसीबी बंद ठेऊ नका, ही विनंती.

हे वीजदेयक कोणाच्याही मालमत्तेची मालकी हक्क सिद्ध करण्यासाठी वापरण्यात येऊ नये.

Rahemat
7/5/2016

(b)

श्री. आसीफ अहमद अब्दुल सत्तार अन्सारी 61/C
इ.क्र. २१बी, आर.एस. निमकर मार्ग,
कामाठीपुरा, १२वी गल्ली, मुंबई-०८
दि. ०७/०५/२०१६
मो.नं. ९८७०७८६५८५.

<u>जबाब</u>

विषय :- इ.क्र. १२-१२अेबी, फोरस रोड
"गुलमोहर बिल्डींग" कामाठीपुरा
१४वी गल्ली, मुंबई-०८
संदर्भ :- अपघाताने इमारत कोसळल्याच्या
दि. ३०/०४/२०१६

इमारत क्र. १२-१२अेबी, फोरस रोड, गुलमोहर बिल्डींग" कामाठीपुरा, १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि. ३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उप मुख्य अभियंता /परिमंडळ-२/मु.इ.दु.व पु.मंडळ कार्यालयात दि. ०६/०५/२०१६ रोजी मला बोलाविले असता मी श्री. आसीफ अहमद अब्दुल सत्तार अन्सारी वय वर्षे ४० राहणार इ.क्र. २१ बी, आर.एस. निमकर मार्ग कामाठीपुरा, १२वी गल्ली मुंबई-०८, खालीलप्रमाणे जबाब देत आहे.

उपरोक्त इ.क्र. १२-१२अेबी कामाठीपुरा १४वी गल्ली या इमारतीच्या समोरील इ.क्र. २१ बी, कामाठीपुरा १२वी गल्ली या इमारतीमध्ये माझे दुकान आहे. या भागातील इमारती-बाबत मला माहिती असून या परिसरातील इमारती सर्व-साधारणपणे ८० ते १०० वर्षे जून्या आहेत. या परिसरात आर.एस. निमकर मार्ग व कोसळलेल्या इमारती समोर डांबरी रस्ता व कॉंक्रीट ० त्या खालील कॉंक्रीट रस्त्याचे जेसीबी च्या सहाय्याने खोदकाम दि. ३०/०४/२०१६ च्या सुमारे ८-१० दिवसांपूर्वी पासून चालु होते. या रस्त्याच्या खोदकामामुळे आजुबाजुच्या इमारतींना हादरे बसल्याचे जाणवत होते.

उपरोक्त इमारत कोसळली तेंव्हा मी माझ्या वरील पत्त्यावरील दुकानात होतो व सदर इमारत हि त्या समोरील
क्र.मा.प. - - -

रस्ता राजजी मानाजी रोड (आर.एस. निमकर मार्ग) या रस्त्यावर कोसळली असे मी पाहिले. हि इमारत १०० वर्षा पेक्षा जास्त जुनी असल्याकारणाने कोसळली असावी असे माझे वैयक्तिक मत आहे.

उपरोक्त जबाब मी राजीखुशीने स्वईच्छेनुसार लिहून देत आहे.

उपरोक्त जबाब मी उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ मुं. इ. दु. व पु. मंडळ यांना हिंदी भाषेत दिला व सदर जबाब मराठी भाषेत नोंदविण्यात आला व तो त्यांनी मला वाचून व समजावून सांगितला व तो मला पूर्णपणे समजला आहे म्हणून मी त्या जबाबावर स्वाक्षरी करीत आहे.

Asif

Asif Ansari
7/5/2016

63/८

श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे,
शांताकुंज, तळमजला, द.स.बाबरेकर मार्ग,
गोखले रोड नॉर्थ, दादर [प], मुंबई-२८.
मो.नं.:- ९८९२०६७४५८
दिनांक :- ११/०५/२०१६

जबाब

**विषय :-** इमारत क्र. **१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.११/०५/२०१६ रोजी मला बोलविले असता मी, श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे, वय वर्षे ६६ राहणार शांताकुंज, तळमजला, द.स.बाबरेकर मार्ग, गोखले रोड नॉर्थ, दादर [प], मुंबई-२८. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाकरीता का.अ./ई-२ विभाग हयांच्या तोंडी सुचनेवरुन, सदर इमारतीच्या दुरुस्ती काम करण्या करीता आवश्यक ते अंदाजपत्रक तयार करण्या करीता मी, संबंधीत का.अ./ई-२ विभागाच्या उप अभियंता सह दि.२९/०२/२०१६ रोजी इमारतीची प्रथम संयुक्त पहाणी केली होती.

१] सदर पहाणीच्या वेळी तळमजल्यावरील जिना, स्वयंपाकघर तसेच १ला, २रा व ३रा मजल्यावरील जिना पॅसेज, संडास-बाथरुम इ. ठिकाणी टेकू लावल्याचे दिसून आले, तसेच इमारतीच्या जिना लगत १ला, २रा व ३रा मजल्यावरील भिंत ओलसरपणाने फुगलेली असल्याने ती भिंत काढल्याचे समजते.

२] प्रथम संयुक्त पहाणीच्या वेळी इमारतींच्या केवळ दृष्य असलेल्या भागांची पहाणी करुन त्या भागात आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित केली होती. उदा. इमारतीचा मोडकळीत आलेल्या जिन्याचा भाग... जिन्याचे लॅंडीग टप्पे जिन्या लगतचे लाकडी खांब व तुळया जिन्या लगतची भिंतींचे बांधकाम व प्लास्टर काम इत्यादी, इमारतीमधील तळ मजल्यावरील छताला फॉल सिलिंग असल्यामुळे तसेच भिंतींना टाइल्स असल्याकारणाने त्या भागाची पहाणी केली, तथापी सकृत दर्शनी सदर भागास

इमारतीच्या अंदाजपत्रकात केवळ उघड डोळ्याने दिसत असलेल्या खराब भागाचेच दुरुस्तीचे काम गृहीत धरण्यात आले होते. (Plan & estimate are prepared based on visual inspection to portion which was required structural repair or visible part only).

सदर इमारतीच्या प्रत्यक्ष दुरुस्ती काम करण्याचावेळी पुन्हा दुसरी संयुक्त पाहणी केली, त्यावेळेसही इमारती मधील जिन्या व जिन्या लगतची भिंत या व्यतिरिक्त इतर दृष्य भागामध्ये धोकादायक किंवा पडझड होईल असा भाग दिसून आला नाही.

मी तयार केलेल्या विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य निधितुन काम करावयाच्या **अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश होता.**

अ] दि.०७/०४/२०१६ रोजी दिलेल्या **विधान परिषद सदस्य** निधीतील कार्यादेशान्वये खालील प्रकारे दुरुस्ती कामाचा समावेश होता.

१] जिन्या लगत भिंतीचे वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्या लगतचे लाकडी खांब काढुन त्याऐवजी लोखंडी खांब बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे लादी-कोबा-लादी काम करणे, तळमजल्या पासून ते तिस-या मजल्याच्या छता पर्यंत काम.

ब] दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या **विधानसभा सदस्य** निधीतील कार्यादेश अन्वये इमारतीच्या दुरुस्ती कामामध्ये खालील कामाचा समावेश होता.

१] इमारतीच्या समोरील मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील तळ मजला सोडून पहिल्या मजला ते तिस-या मजल्या पर्यंत बाहेरील भिंतीच्या गिलावा करणे व इमारतीच्या छताच्या जल-रोधीकरण काम (Terrace Water Proofing Work)

२] प्रथम व द्वितिय संयुक्त पहाणीच्या वेळी उपरोक्त दुरुस्ती कामाच्या भागा व्यतिरिक्त इतर भागात सकृत दर्शनी दुरुस्ती कामाची आवश्यकता भासली नाही. तसेच भाडेकरुंनीही दुरुस्तीचे आवश्यकते बाबत सांगितले नाही.

उपरोक्त नमूद दोन्ही निधीतील कामापैकी विधान परिषद सदस्य निधीतील काम प्रत्यक्षरीत्या साधारणपणे दि.११/०४/२०१६ रोजी सुरु करण्यात आले. दि.३०/०४/२०१६ पर्यंत सदर कामांपैकी खालील दुरुस्ती कामे करण्यात आली होती.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या तोडण्यात आलेल्या भिंतीच्या बाजूचे लाकडी खांब व तुळया [बीम] काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी खांब लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या

२] विधानसभा सदस्य निधीतील दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या कार्यादेशाच्या अनुषंगाने इमारतीच्या समोरील राजूजी मानाजी रोड कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते. सदर काम करीत असताना अधुन-मधुन दुरुस्ती कामाच्या देखरेखीसाठी व आवश्यक त्या सुचनेसाठी मी जात होतो.

वर नमुद काम करीत असताना उपरोक्त इमारत ही धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून आले नाही. इमारतीमध्ये एकच जिना असल्याने व तो वापरण्यायोग्य नसल्या कारणाने भाडेकरु/रहिवाशी यांनी दुरुस्ती काम सुरु करण्यापुर्वी इमारत रिकामी केली होती. इमारतीचे दुरुस्ती काम करीत असताना इमारती समोरील मानाजी राजूजी मार्गा वर डांबरी व त्या खाली कॉंक्रीट रस्त्याचे जे.सी.बी. मशीन वापरुन खोदकाम चालू होते. सदर खोदकामामध्ये निघालेले राबीट [मलबा] (Debris) जे.सी.बी. ने ठोकून तुकडे करण्यात येत होते.

उपरोक्त विषयांकित इमारत ही अंदाजे १०० वर्षांपेक्षा अधिक जुनी आहे, या इतारतीतील ज्या लाकडी खांब, तुळया व ठिसूळ झालेल्या भारवाहक भिंतींचे भाग जे उघडया डोळयाने दिसत नव्हते (Hidden part of wooden/ Beam, Post and L.B.W.) तो भाग कमकुवत झाल्यामुळे व इमारतीचा भार पेलण्यास सक्षम नसल्याने इमारत अचानकपणे कोसळली असावी.

उपरोक्त जबाब मी राजी खुशीने, नशा पाणी न करता व कुणाच्या ही दबावाखाली न येता लिहून देत आहे.

Bhandare

श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे

9

67/

श्री.सुधीर रामदास येवले
९०५, प्रथमेश टॉवर,
न्यु एम.एच.बी.कॉलनी,
लिंक रोड, बोरीवली [प.],
मुंबई-४०० ०९१.
मो.नं.:-९८६७३२३२६३
दिनांक :-११/०५/२०१६

<u>जबाब</u>

**विषय :-** इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ या कार्यालयात दि.११/०५/२०१६ रोजी मला बोलविले असता तत्कालीन उप अभियंता/ई-२ विभाग श्री.सुधीर रामदास येवले, वय वर्षे ४८ राहणार ९०५, प्रथमेश टॉवर, न्यु एम.एच.बी.कॉलनी, लिंक रोड, बोरीवली [प.], मुंबई-४०० ०९१. मी, या ठिकाणी सादर करु इच्छितो की माझी एस.आर.ए. या विभागात बदली झाल्याने मला ई-२ विभागातून दि.२०/०४/२०१६ रोजी कार्यमुक्त केले होते व बदलीच्या ठिकाणी मी रुजु झालो आहे. मी खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

उपरोक्त इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ या इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी यांनी इमारतीच्या दुरुस्ती संदर्भात कार्यकारी अभियंता/ई-२ विभागाकडे संपर्क साधला होता. त्यानुसार कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग यांचे सोबत मी इमारतीची पहाणी केली. पहाणी दरम्यान इमारतीमधील जिन्याकडील भागास दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे दिसून आले. तेथे तातडीने टेकू लावणे आवश्यक असल्याने तेथे टेकू लावण्याचे आदेश ठेकेदारास दिले. जिन्याच्या बाजुची भिंत कमकुवत दिसत असल्यामुळे ती तातडीने काढुन टाकण्याच्या सुचना व कार्यादेश ठेकेदारास दिल्या होत्या व ठेकेदाराने सदरचे काम सुरु केले होते.

१] सदर इमारतीचा दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचा दृष्टीने वास्तुशास्त्रज्ञा समवेत मी उपरोक्त इमारतीची संयुक्त पाहणी केली होती, त्यावेळी तळमजल्यावरील जिना, स्वयंपाकघर तसेच

२] प्रथम संयुक्त पहाणीच्या वेळी इमारतींच्या केवळ दृष्य असलेल्या भागांची पहाणी करुन त्या भागात आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित केली होती. उदा. इमारतीचा मोडकळीस आलेल्या जिन्याचा भाग जिन्याचे लँडीग टप्पे जिन्या लगतचे लाकडी खांब व तुळया [बीम] जिन्या लगतची भिंतींचे बांधकाम व प्लास्टर काम इत्यादी, इमारतीमधील तळ मजल्यावरील छताला फॉल सिलिंग असल्यामुळे तसेच भिंतींना टाइल्स असल्याकारणाने त्या भागाची पहाणी केली, तथापी सकृत दर्शनी सदर भागास दुरुस्तीची आवश्यकता दिसून आली नाही.

दुरुस्तीचा अंदाजपत्रकात केवळ उघड डोळयाने दिसत असलेल्या इमारतीचा खराब भागाचेच दुरुस्तीचे काम गृहीत धरण्यात आले होते. (Plan & estimate are prepared based on visual inspection to portion which was required structural repair for visible part only)

सदर इमारतीचे प्रत्यक्ष दुरुस्ती काम सुरु करण्याआधी कार्यकारी अभियंता, वास्तुशास्त्रज्ञ ठेकेदार व भाडेकरु/रहिवाशी यांचे समवेत पुन्हा संयुक्त पहाणी केली, त्यावेळेसही इमारतीमधील जिन्याचा भाग व त्यास लागून भिंतीचे कामा व्यतिरिक्त इमारतीच्या इतर दृष्य भागामध्ये धोकादायक किंवा पडझड होईल असा भाग दिसून आला नाही हि वस्तुस्थिती आहे.

उपरोक्त जबाब मी, राजी-खुशीने नशा-पाणी न करता व कुणाच्या ही दवाबाखाली न येता लिहून देत आहे.

[signature] ११/०५/२०१६
उपअभियंता (तत्कालीन)
श्री.सुधीर रामदास येवले सा. ५.४० वा.

श्री.मोहन पी.शिंदे
मुकुंद नगर,
श्रीगणेश को. ऑ.हौ. सोसायटी,
रुम नं.अे-२१-५-२/२,
७वा मजला, धारावी, मुंबई-१७
मो.नं. ९८६९४४१७८८
दिनांक :- ११/०५/२०१६

जबाब

**विषय :-** इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग"**, कामाठीपुरा १४वी गल्ली; मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

विषयांकित इमारत अचानकपणे दि.३०/०४/२०१६ रोजी दुपारी २.०० च्या सुमारास कोसळली. त्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ यांनी चौकशी करीता आज दि.११/०५/२०१६ रोजी मला बोलाविले असता मी, श्री.मोहन पी.शिंदे वय वर्षे ६०, राहणार मुकुंद नगर, श्रीगणेश को. ऑ.हौ. सोसायटी, रुम नं.अे-२१-५-२/२, ७वा मजला, धारावी, मुंबई-१७ खालीलप्रमाणे जबाब देतो की,

विषयांकित इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता विधानपरिषद सदस्य निधीतील दुरुस्ती कामाचे कार्यादेश पत्र क्र.१८७३, दि.०७/०४/२०१६ अन्वये मला दिले होते, तसेच विधान सभा सदस्य निधीतील दुरुस्ती कामाचे कार्यादेश पत्र क्र.२२३५, दि.२८/०४/२०१६ अन्वये मला दिले होते.

अ] दि.०७/०४/२०१६ रोजी दिलेल्या विधान परिषद सदस्य निधीतील कार्यादेशान्वये खालील प्रकारे दुरुस्ती कामाचा समावेश होता :-

१] जिन्या लगत भिंतीची वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्या कडील भिंती लगतचे लाकडी खांब व तुळया [बीम] काढुन त्याऐवजी लोखंडी खांब व तुळया [बीम] बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे लादी-कोबा-लादी काम करणे, तळमजल्या पासून ते तिस-या मजल्याच्या छता पर्यंतचे काम.

ब] दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या विधानसभा सदस्य निधीतील कार्यादेश अन्वये इमारतीच्या दुरुस्ती कामामध्ये खालील कामाचा समावेश होता :-

१] इमारतीच्या समोरील मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील तळ मजला सोडून पहिल्या मजला ते तिस-या मजल्या पर्यंत बाहेरील भिंतीच्या

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या तोडण्यात आलेल्या भिंतीच्या बाजूस असलेले लाकडी खांब व बीम काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबं व तुळयांच्या ठिकाणी लोखंडी खांब व तुळया लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते.

२] विधानसभा निधीतील दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या कार्यादेशाच्या अनुषंगाने इमारतीच्या समोरील राजूजी मानाजी रोड कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते. सदर काम करीत असताना अधुन-मधुन दुरुस्ती कामा करीता मंडळाने नेमलेले वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे किंवा त्यांचे सहाय्यक हे देखरेख करण्या करीता येत होते. त्यांच्या देखरेखीखाली व सुचने नुसार काम करण्यात येत होते. सदर इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता मी ठेवलेल्या सर्व कामगारांना इमारतीच्या दुरुस्ती कामाचा पुरेसा अनुभव होता व या पूर्वीही त्यांनी इमारतीचे दुरुस्तीचे काम केलेले आहे.

उपरोक्त इमारत कोसळली त्यावेळेस इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता माझ्याकडील खालील व्यक्ती मजूर काम करीत होत्या.

१] सरफुल जिफाई मोलला - वय २८ वर्षे
२] समीरल जिफाई मोलला - वय २४ वर्षे
३] जबरुल मेंटर मोलला - वय १६ वर्षे
४] स्मियारुल जिफाई मोलला - वय १९ वर्षे

वर नमुद कामगार इमारतीच्या दुरुस्तीचे काम करीत होते. दि.३०/०४/२०१६ रोजी अपघाताच्या दिवशी अ.क्र.१ ते ४ मजूर कामावर होते. दुपारच्या वेळेस अचानक इमारत कोसळली व या अपघातामध्ये अ.क्र.१, २, ३ व वर नमुद जेवणाचा डबा घेऊन आलेला मुलगा असे एकुण ०४ जणांचा मृत्यु झाला व अ.क्र.४ मधील मजूर जखमी झाला. या अपघातामध्ये या व्यतिरीक्त इमारतीचा तळमजल्यावरील १ पान टपरीवाला व १ बाई असे एकूण ०६ जणांचा मृत्यु झाला.

वर नमुद काम करण्याच्या वेळी इमारत ही धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येत नव्हती.

इमारत दुरुस्ती काम करणे पूर्वी तळ मजल्यावरील हॉटेल न्यु राष्ट्रीय बार, पहिल्या मजल्यावरील भाडेकरु, दुसरा व तिस-या मजल्या वरील भाडेकरु यांनी इमारत रिकामी केली होती व ते अधुन मधुन इमारतीत दुरुस्ती कामाचे वेळी येत असत. सदर काम करीत असताना मानाजी राजूजी मार्गा वरील डांबरी व त्या खाली कॉंक्रीट रस्त्याचे जे.सी.बी. मशीन वापरुन खोदकाम चालू होते. सदर खोदकामामध्ये निघालेले राबीट [मलबा] (Debris) जे.सी.बी. ने ठोकून तुकडे करण्यात येत होते.

71/c

सदर कामासाठी माझ्या सोबत माझ्या अनुपस्थितीत श्री.प्रकाश बापूराव जवादे वय वर्षे ५० राहणार बिल्डिंग क्र.६५, बी-वींग, रुम नं.१०५, टिळक नगर, चेंबूर हे देखिल काम पाहत होते.

उपरोक्त जबाब मी, राजी-खुशीने नशा-पाणी न करता व कुणाच्या ही दवाबाखाली न येता लिहून देत आहे.

MOHAN
[श्री.मोहन पी.शिंदे]

श्री.मोहन पी. शिंदे यांनी वर नोंदविलेल्या जबाबाशी मी संपूर्णपणे सहमत आहे.

[श्री.प्रकाश बापूराव जवादे]

73/c

श्री.संजय जाधव,
कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग,
मुं.ई.दु.व पु. मंडळ,
इमारत क्र.३५, अभ्युदय नगर,
काळाचौकी, मुंबई-३३.
मो.नं.:-
दिनांक :- २३/०५/२०१६

<u>जबाब</u>

**विषय :-** इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.२३/०५/२०१६ रोजी हजर होऊन मी, श्री.संजय जाधव, कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग, मुं.ई.दु.व पु. मंडळ, इमारत क्र.३५, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

२] विषयांकित इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी यांनी दि.०२.०२.२०१६ रोजी इमारतीतील जिन्याकडील भाग धोकादायक स्थितीत असल्याचा निरोप दिला त्या अनुषंगाने त्वरीत मी उपअभियंता सोबत सदर इमारतीची प्रत्यक्ष पहाणी केली. सदर पहाणीच्या वेळेस इमारतीतीमधील पहिल्या व दुस-या मजल्यावरील जिन्या जवळील भिंत ओलसरपणा आल्यामुळे फुगली असल्याचे निदर्शनात आले तसेच तळमजल्यावरील किंवा स्वयंपाकघर पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील संडास-बाथरुम इत्यादी ठिकाणी टेकू लावणे आवश्यक असल्याचे जाणवले त्यामुळे त्या ठिकाणी दि.०३.०२.२०१६ रोजी मे.इगल कंस्ट्रक्शन, मुंबई या कंत्राटदारास टेकू लावणे व इमारतीमधील जिन्याकडील धोकादायक भाग पाडण्याचे कार्यादेश दिले. त्याप्रमाणे संबंधीत ठेकेदाराने दि.१०.०२.२०१६ पर्यंत इमारतीच्या तळमजल्यावरील जिना, स्वंयपाकघर तसेच पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील जिना पॅसेज, संडास-बाथरुम इत्यादी ठिकाणी टेकू लावले. तसेच इमारतीच्या जिन्या लगत पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील भिंत ओलसरपणामुळे फुगलेली असल्यामुळे काढण्यात आल्याचे इमारतीची पुन्हा पाहणी केली तेव्हा आढळले.

३] सदर इमारतीमधील दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने वास्तुशास्त्रज्ञ नेमणूकीसाठी दि.२६/०२/२०१६

रकमेचे काम केलेले असल्याकारणाने दुरुस्ती उपकर निधीतुन साधारणतः रु.२.०० लक्ष निधी शिल्लक राहत असल्याने व त्यामधून इमारतीची पूर्ण दुरुस्ती काम करणे शक्य नसल्याने भाडेकरु/रहिवाशी यांना वास्तुशास्त्रज्ञ यांनी सादर केलेले अंदाजपत्रक व नकाशे नुसार दुरुस्तीचा दर हा प्रचलित दुरुस्ती दराची कमाल मर्यादा रक्कम रु.३०००/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त येत असल्यामुळे दुरुस्ती कमाल मर्यादेवरील अतिरिक्त रक्कम रु.५.०५ लक्ष या रकमेचा भरणा करण्या करीता इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी/मालक यांना पत्र दि.२२/०३/२०१६ अन्वये कळविले. तथापी भाडेकरु/रहिवाशी यांनी सदर रकमेचा भरणा करणे शक्य नसल्याचे व या अतिरिक्त रकमेकरीता स्थानिक आमदार निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे सांगितले. त्यानुसार मा.आमदार श्री.भाई जगताप [वि.प.स.] व मा.आमदार श्री.अमीन पटेल [वि.स.स.] यांच्या शिफारसीनुसार मा.जिल्हाधिकारी/मुंबई शहर हयांनी रक्कम रु.३.०० लक्ष व रक्कम रु.३.०० लक्ष या रकमेस प्रशासकिय मंजूरी प्रदान केली आहे. तदनुसार मंडळातील प्रचलित कार्यपध्दतीनुसार सदर कामांचे दि.०७/०४/२०१६ रोजी व दि.२८/०४/२०१६ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले.

विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य निधितुन काम करावयाच्या अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश होता.

अ] दि.०७/०४/२०१६ रोजी दिलेल्या **विधान परिषद सदस्य** निधीतील कार्यादेशान्वये खालील प्रकारे दुरुस्ती कामाचा समावेश होता.

१] जिन्या लगत भिंतीचे वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्या लगतचे लाकडी खांब काढुन त्याऐवजी लोखंडी खांब बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे लादी-कोबा-लादी काम करणे, तळमजल्या पासून ते तिस-या मजल्याच्या छता पर्यंत काम.

ब] दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या **विधानसभा सदस्य** निधीतील कार्यादेश अन्वये इमारतीच्या दुरुस्ती कामामध्ये खालील कामाचा समावेश होता.

१] इमारतीच्या समोरील मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील तळ मजला सोडून पहिल्या मजला ते तिस-या मजल्या पर्यंत बाहेरील भिंतीच्या गिलावा करणे व इमारतीच्या छताच्या जल-रोधीकरण काम (Terrace Water Proofing Work)

२] प्रथम व द्वितिय संयुक्त पहाणीच्या वेळी वास्तुशास्त्रज्ञ यांनी अहवालानुसार उपरोक्त दुरुस्ती कामाच्या भागा व्यतिरिक्त इतर भागात सकृत दर्शनी दुरुस्ती कामाची आवश्यकता भासली नाही., तसेच भाडेकरुंनीही दुरुस्तीचे आवश्यकते बाबत सांगितले नाही.

वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे, संबंधीत उपअभियंता, मी व कंत्राटदार यांनी इमारतीची दि.११/०४/२०१६ रोजी दुसरी संयुक्त पहाणी केली. सदर पहाणीच्या वेळी इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी हे उपस्थित होते व त्यांचे समोर उपरोक्त नमूद केलेले दुरुस्ती काम

सदर पहाणीच्या वेळी भाडेकरु/रहिवाशी यांनी पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील आपल्या खोल्या रिकाम्या केल्या असल्याचे दिसून आले.

प्रथम संयुक्त पहाणी किंवा द्वितीय संयुक्त पहाणीच्या वेळी इमारतीचा केवळ दृष्य भागाची पहाणी करुन त्या भागात आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित केली होती. उदा. इमारतीचा मोडकळीस आलेल्या जिन्याचा भाग जिन्याचे लँडीग टप्पे जिन्या लगतचे लाकडी खांब व तुळया जिन्या लगतची भिंतींचे बांधकाम व प्लास्टर काम इत्यादी, वास्तुशास्त्रज्ञ यांच्या अहवालानुसार इमारतीमधील तळ मजल्यावरील छताला फॉल सिलिंग असल्यामुळे व पहिल्या ते तिस-या मजल्यावरील गाळ्यामध्ये भिंतींना टाइल्स असल्याकारणाने त्या भागाची पहाणी केली असता, सदर भागास दुरुस्तीची आवश्यकता भासली नाही. तसेच भाडेकरु/रहिवाशी यांनीही दुरुस्तीचे आवश्यकते बाबत सांगितले नाही.

उपरोक्त नमूद दोन्ही निधीतील कामापैकी विधान परिषद सदस्य निधीतील काम प्रत्यक्षरीत्या साधारणपणे दि.११/०४/२०१६ रोजी सुरु करण्यात आले. दि.३०/०४/२०१६ पर्यंत सदर कामांपैकी खालील दुरुस्ती कामे करण्यात आली होती. दि.३०/०४/२०१६ पर्यंत वास्तुशास्त्रज्ञ यांनी अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या बाबी व्यतिरिक्त इमारतीमधील इतर भागांमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याबाबत कळविले नव्हते.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या तोडण्यात आलेल्या भिंतीच्या बाजूचे लाकडी खांब व तुळया [बीम] काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी खांब लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते.

२] विधानसभा सदस्य निधीतील दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या कार्यादेशाच्या अनुषंगाने इमारतीच्या समोरील राजूजी मानाजी रोड कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते.

वर नमुद काम करीत असताना उपरोक्त इमारत ही धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून आले नाही. दि.३०/०४/२०१६ पर्यंत वास्तुशास्त्रज्ञ यांनी अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या बाबी व्यतिरिक्त इमारतीमधील इतर भागांमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याबाबत कळविले नव्हते. इमारतीमध्ये एकच जिना असल्याने व तो वापरण्यायोग्य नसल्या कारणाने भाडेकरु/रहिवाशी यांनी दुरुस्ती काम सुरु करण्यापूर्वी इमारत रिकामी केली होती. त्यानंतर ठेकेदार मे.मोहन पी.शिंदे यांनी दुरुस्ती करताना योग्य काळजी घेणे गरजेचे होते, जसे कामगारांना हेल्मेट, सेफटी ब्लेट, कामगार वरुन पडणार नाही यासाठी बॅरेकेट करणे हि ठेकेदाराची जबाबदारी आहे. तसेच ठेकेदाराने लगतच्या

इमारती समोरील मानाजी राजूजी मार्गा वर डांबरी व त्या खाली कॉंक्रीट रस्त्याचे जे.सी.बी. मशीन वापरुन खोदकाम चालू होते. सदर खोदकामामध्ये निघालेले राबीट [मलबा] (Debris) जे.सी.बी. ने ठोकून तुकडे करण्यात येत होते. त्यामुळे आजुबाजूच्या इमारतींना हादरे बसल्याचे जाणवत होते असे स्थानिक रहिवाशी यांनी इमारत कोसळल्यानंतर सांगितले.

उपरोक्त विषयांकित इमारत ही अंदाजे १०० वर्षांपेक्षा अधिक जुनी होती, मे.मोहन पी.शिंदे या ठेकेदाराने योग्य ती काळजी घेणे अपेक्षित होते. या इमारतीतील ज्या लाकडी खांब, तुळया व ठिसूळ झालेल्या भारवाहक भिंतींचे भाग जे उघडया डोळयाने दिसत नव्हते (Hidden part of wooden/ Beam, Post and Load Bearing Wall) तो भाग कमकुवत झाल्यामुळे व इमारतीचा भार पेलण्यास सक्षम नसल्याने इमारत अचानकपणे कोसळली असावी. या दुर्घटनेस निव्वळ अपघात (Accident) असे परिभाषित (Defined) करता येईल.

S/adhav/-

श्री.संजय जाधव

कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग

मुं.ई.दु.व पु. मंडळ

77/5

श्री.राजेंद्र भोसले/शाखा अभियंता,
उपअभियंता क्र.१चा [अतिरिक्त कार्यभार]
ई-२ विभाग/मुं.ई.दु.व पु. मंडळ,
इमारत क्र.३५, अभ्युदय नगर,
काळाचौकी, मुंबई-३३.
मो.नं.:- ९८३३८३६५४१
दिनांक :- २७/०५/२०१६

## जबाब

**विषय :-** इमारत क्र.**१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलमहल बिल्डींग",** कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८. दुरुस्ती उपकर क्र.**ई-२१५२**

**संदर्भ :-** अपघाताने इमारत कोसळल्याचा दि.३०/०४/२०१६ च्या बाबतचा.

इमारत क्र.१२-१२-अेबी, फोरस रोड, "गुलनोहर बिल्डींग", कामाठीपुरा १४वी गल्ली, मुंबई-०८ हि इमारत दि.३०/०४/२०१६ रोजी अचानकपणे कोसळली. सदर इमारत कोसळण्याबाबतच्या चौकशी करीता उपमुख्य अभियंता / परिमंडळ-३ / मुं.ई.दु.व पु. मंडळ कार्यालयात दि.२३/०५/२०१६ रोजी हजर होऊन मी, श्री.राजेंद्र भोसले, उपअभियंता [अतिरिक्त कार्यभार]/ई-२ विभाग, मुं.ई.दु.व पु. मंडळ, इमारत क्र.३५, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३. खालीलप्रमाणे जबाब देत आहे:-

२] विषयांकित इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी यांनी दि.०२.०२.२०१६ रोजी इमारतीतील जिन्याकडील भाग धोकादायक स्थितीत असल्याचा निरोप दिला त्या अनुषंगाने, त्वरीत कार्यकारी अभियंता व तत्कालीन उपअभियंता यांचे समवेत सदर इमारतीची प्रत्यक्ष पहाणी करण्यात आली. सदर पहाणीच्या वेळेस इमारतीतीमधील पहिल्या व दुस-या मजल्यावरील जिन्या जवळील भिंत ओलसरपणा आल्यामुळे फुगली असल्याचे निदर्शनात आले तसेच तळमजल्यावरील किंवा स्वयंपाकघर पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील संडास-बाथरुम इत्यादी ठिकाणी टेकू लावणे आवश्यक असल्याचे जाणवले त्यामुळे त्या ठिकाणी दि.०३.०२.२०१६ रोजी मे.इगल कंस्ट्रक्शन, मुंबई या कंत्राटदारास टेकू लावणे व इमारतीमधील जिन्याकडील धोकादायक भाग पाडण्याचे कार्यादेश दिले. त्याप्रमाणे संबंधीत ठेकेदाराने दि.१०.०२.२०१६ पर्यंत इमारतीच्या तळमजल्यावरील जिना, स्वंयपाकघर तसेच पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील जिना पॅसेज, संडास-बाथरुम इत्यादी ठिकाणी टेकू लावले. तसेच इमारतीच्या जिन्या लगत पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील भिंत ओलसरपणामुळे फुगलेली असल्यामुळे काढण्यात आल्याचे इमारतीची पुन्हा पाहणी केली असता तेव्हा आढळुन आले.

रकमेचे काम केलेले असल्याकारणाने दुरुस्ती उपकर निधीतुन साधारणत: रु.२.०० लक्ष निधी शिल्लक राहत असल्याने व त्यामधून इमारतीची पूर्ण दुरुस्ती काम करणे शक्य नसल्याने भाडेकरु/रहिवाशी यांना वास्तुशास्त्रज्ञ यांनी सादर केलेले अंदाजपत्रक व नकाशे नुसार दुरुस्तीचा दर हा प्रचलित दुरुस्ती दराची कमाल मर्यादा रक्कम रु.३०००/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त येत असल्यामुळे दुरुस्ती कमाल मर्यादेवरील अतिरिक्त रक्कम रु.५.०५ लक्ष या रकमेचा भरणा करण्या करीता इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी/मालक यांना पत्र दि.२२/०३/२०१६ अन्वये कळविले. तथापी भाडेकरु/रहिवाशी यांनी सदर रकमेचा भरणा करणे शक्य नसल्याचे व या अतिरिक्त रकमेकरीता स्थानिक आमदार निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे सांगितले. त्यानुसार मा.आमदार श्री.भाई जगताप [वि.प.स.] व मा.आमदार श्री.अमीन पटेल [वि.स.स.] यांच्या शिफारसीनुसार मा.जिल्हाधिकारी/मुंबई शहर हयांनी रक्कम रु.३,००,०००/- [रु.तीन लक्ष] व रक्कम रु.३,००,०००/- [रु.तीन लक्ष] या रकमेस प्रशासकिय मंजूरी प्रदान केली आहे. तदनुसार मंडळातील प्रचलित कार्यपध्दतीनुसार सदर कामांचे दि.०७/०४/२०१६ रोजी व दि.२८/०४/२०१६ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले.

विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य निधितुन काम करावयाच्या अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश होता.

अ] दि.०७/०४/२०१६ रोजी दिलेल्या **विधान परिषद सदस्य** निधीतील कार्यादेशान्वये खालील प्रकारे दुरुस्ती कामाचा समावेश होता.

१] **जिन्या लगत भिंतीचे वीट बांधकाम व आतील बाहेरील प्लास्टरचे काम.**

२] इमारतीच्या पहिल्या मजल्या पासून तिस-या मजल्या पर्यंत लाकडी जिन्याचे दुरुस्तीचे काम.

३] जिन्या लगतचे लाकडी खांब काढुन त्याऐवजी लोखंडी खांब बसविणे, जिन्याच्या लॅडींगचे लादी-कोबा-लादी काम करणे, तळमजल्या पासून ते तिस-या मजल्याच्या छता पर्यंत काम.

ब] दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या **विधानसभा सदस्य** निधीतील कार्यादेश अन्वये इमारतीच्या दुरुस्ती कामामध्ये खालील कामाचा समावेश होता.

१] इमारतीच्या समोरील मानाजी राजूजी रोड व कामाठीपुरा १४ वी गल्ली कडील तळ मजला सोडून पहिल्या मजला ते तिस-या मजल्या पर्यंत बाहेरील भिंतीच्या गिलावा करणे व इमारतीच्या छताच्या जल-रोधीकरण काम (Terrace Water Proofing Work)

२] प्रथम व द्वितिय संयुक्त पहाणीच्या वेळी वास्तुशास्त्रज्ञ यांनी अहवालानुसार उपरोक्त दुरुस्ती कामाच्या भागा व्यतिरिक्त इतर भागात सकृत दर्शनी दुरुस्ती कामाची आवश्यकता भासली नाही. तसेच भाडेकरुंनीही दुरुस्तीचे आवश्यकते बाबत सांगितले नाही.

वास्तुशास्त्रज्ञ श्री.रश्मिन रघुनंदन भांडारे, संबंधीत उपअभियंता, मी व कंत्राटदार यांनी इमारतीची दि.११/०४/२०१६ रोजी दुसरी संयुक्त पहाणी केली. सदर पहाणीच्या वेळी

79/c

सदर पहाणीच्या वेळी भाडेकरु/रहिवाशी यांनी पहिला, दुसरा व तिस-या मजल्यावरील आपल्या खोल्या रिकाम्या केल्या असल्याचे दिसून आले.

प्रथम संयुक्त पहाणी किंवा द्वितीय संयुक्त पहाणीच्या वेळी इमारतीचा केवळ दृष्य भागाची पहाणी करुन त्या भागात आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित केली होती. उदा. इमारतीचा मोडकळीस आलेल्या जिन्याचा भाग जिन्याचे लँडीग टप्पे जिन्या लगतचे लाकडी खांब व तुळया जिन्या लगतची भिंतींचे बांधकाम व प्लास्टर काम इत्यादी, वास्तुशास्त्रज्ञ यांच्या अहवालानुसार इमारतीमधील तळ मजल्यावरील छताला फॉल सिलिंग असल्यामुळे व पहिल्या ते तिस-या मजल्यावरील गाळामध्ये भिंतींना टाइल्स असल्याकारणाने त्या भागाची पहाणी केली असता, सदर भागास दुरुस्तीची आवश्यकता भासली नाही. तसेच भाडेकरु/रहिवाशी यांनीही दुरुस्तीचे आवश्यकते बाबत सांगितले नाही.

उपरोक्त नमूद दोन्ही निधीतील कामापैकी विधान परिषद सदस्य निधीतील काम प्रत्यक्षरीत्या साधारणपणे दि.११/०४/२०१६ रोजी सुरु करण्यात आले. दि.३०/०४/२०१६ पर्यंत सदर कामांपैकी खालील दुरुस्ती कामे करण्यात आली होती.. दि.३०/०४/२०१६ पर्यंत वास्तुशास्त्रज्ञ यांनी अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या बाबी व्यतिरिक्त इमारतीमधील इतर भागांमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याबाबत कळविले नव्हते.

१] तळ मजला ते तिस-या मजल्या पर्यंत जिन्या लगतच्या तोडण्यात आलेल्या भिंतीच्या बाजूचे लाकडी खांब व तुळया [बीम] काढले. तळ मजला ते तिस-या मजल्याच्या छत लेवल पर्यंत लँडींगचे छत काढले. जिन्याच्या बाजूला आणि काढलेल्या लाकडी खाबांच्या ठिकाणी लोखंडी खांब लावण्याचे काम चालू होते. तळ मजल्याच्या जिन्यातील छत लेवलपर्यंत शौचालया खालील छताच्या लादी कोब्याचे काम केले होते.

२] विधानसभा सदस्य निधीतील दि.२८/०४/२०१६ रोजी दिलेल्या कार्यादेशाच्या अनुषंगाने इमारतीच्या समोरील राजूजी मानाजी रोड कडील पहिला ते तिसरा मजल्या पर्यंतचे भिंतिचे बाहेरील प्लॉस्टरचे काम करण्यात आले होते.

वर नमुद काम करीत असताना उपरोक्त इमारत ही धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून आले नाही व तशी कोणत्याही प्रकारची लक्षणे आढळुन आली नाहीत. जसे की, भिंतीना तडे जाणे, कमकुवत झालेल्या भागाचे प्लॅस्टर खाली पडणे इत्यादी. दि.३०/०४/२०१६ पर्यंत वास्तुशास्त्रज्ञ यांनी अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या बाबी व्यतिरिक्त इमारतीमधील इतर भागांमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याबाबत कळविले नव्हते. इमारतीमध्ये एकच जिना असल्याने व तो वापरण्यायोग्य

घेणे व सुरक्षिततेच्या बाबतीत सर्वकाही उपाय करणे हे ठेकेदाराचे कर्तव्य होते. परंतु रस्त्याचे काम चालु असल्याबाबत ठेकेदाराने या कार्यालयास कळविले नाही. इमारतीचे दुरुस्ती काम करीत असताना इमारती समोरील मानाजी राजूजी मार्गा वर डांबरी व त्या खाली कॉंक्रीट रस्त्याचे जे.सी.बी. मशीन वापरुन खोदकाम चालू होते. सदर खोदकामामध्ये निघालेले राबीट [मलबा] (Debris) जे.सी.बी. ने ठोकून तुकडे करण्यात येत होते व जमिनीखाली असलेल्या लोखंडाचा जुन्या ट्राम ट्रॅक काढण्याचे काम चालु होते (Needle JCB Machine) ने त्यामुळे आजुबाजूच्या इमारतींना हादरे बसल्याचे जाणवत होते असे स्थानिक रहिवाशी यांनी इमारत कोसळल्यानंतर सांगितले.

उपरोक्त विषयांकित इमारत ही अंदाजे १०० वर्षांपेक्षा अधिक जुनी होती, संबंधीत ठेकेदाराने योग्य काळजी घेणे अपेक्षित होते. या इतारतीतील ज्या लाकडी खांब, तुळया व ठिसूळ झालेल्या भारवाहक भिंतींचे भाग जे उघडया डोळयाने दिसत नव्हते (Hidden part of wooden/ Beam, Post and Load Bearing Wall) तो भाग कमकुवत झाल्यामुळे व इमारतीचा भार पेलण्यास सक्षम नसल्याने इमारत अचानकपणे कोसळली असावी. या दुर्घटनेस निव्वळ अपघात (Accident) असे परिभाषित (Defined) करता येईल.

श्री.राजेंद्र भोसले / शाखा अभियंता,
उपअभियंता क्र. १ चा[अतिरिक्त कार्यभार]
कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग
मुं.ई.दु.व पु. मंडळ

81/

Sun May 01 2016 Subscribe Clip

लोकसत्ता

more publications

Like Tweet Share G+1 +2

मुंबई, रविवार,

दि. १ मे २०१६

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

रविवार लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान 35° 25°

रविवार विशेष डाळ का शिजेना ?



[illegible] मार्गदर्शक आहेत. ते [illegible] उत्तम मार्गदर्शन करतात,' असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेच्या विरोधाच्या [illegible] शाल्जोडीतून चपराक दिली.

[illegible] उड्डाणपुलाला राम मंदिर उड्डाणपूल असे नाव द्यावे, अशी मागणी भाजपच्या राज्यमंत्री विद्या ठाकूर यांनी केली होती. परंतु आपल्याला अयोध्येत राम मंदिर [illegible] आहे तेव्हा या उड्डाणपुलाच्या पुढील चौकाला राम मंदिर चौक असे नाव देऊ या, असे सांगत [illegible] ठाकरे यांनी भाजपच्या मागणीची खिल्ली उडविली. या कार्यक्रमास शिवसेना आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. उभय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी (पान १० वर)

## वलत

[illegible] नरसिंह राव यांनी शनिवारी येथे केला. [illegible] विनंतीप्रस्तावाची [illegible] इंदिरा गांधींनी अँण्टनी यांची इच्छा होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अँण्टनी यांच्या इच्छेकडे, दुर्लक्ष करण्याची क्षमता तसेच त्यांना [illegible] आदेश देऊ शकणारी एकच व्यक्ती होती आणि ती म्हणजे सोनिया गांधी, असा आरोप नरसिंह राव यांनी केला. – संबंधित वृत्त १०

# इमारत कोसळून सहा ठार

प्रतिनिधी, मुंबई

**कामाठीपुऱ्यात दुरुस्तीचे काम सुरू असताना तीन मजली इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत सहा जण ठार तर तीन जण जखमी झाले. शनिवारी दुपारी ही दुर्घटना घडली. स्थानिक रहिवासी व अग्निशमन दलाच्या जवानांनी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या आठ जणांची सुखरूप सुटका केली.**

नागपाड्याच्या कामाठीपुऱ्यातील १४व्या गल्लीत पत्थरवाली गोलमहल ही तीन मजली इमारत आहे. या इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर एक अशी तीन कुटुंबे राहतात. तर तळमजल्यावर पाच दुकाने आहेत. मोडकळीस आलेल्या या इमारतीचे दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामुळे इमारतीतील तीनही कुटुंबे इतरत्र वास्तव्यास [illegible] शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास इमारतीचा काही भाग कोसळला. त्यानंतर संपूर्ण इमारतच जमीनदोस्त झाली. यावेळी [illegible] तळमजल्यावरील दुकानात [illegible] जण होते. त्यात सहा जणांचा मृत्यू झाला, तर आठ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली. जखमी जे.जे. आणि नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत ढिगारा उपसण्याचे काम सुरू होते. दरम्यान, इमारतीचे मालक [illegible] पोलीस चौकशी करत आहेत.

**मृतांची नावे**

**वासीम मुल्ला (१४), जाबाझ मुल्ला (३०), सरफुल्ला मुल्ला (२८), अंगद चौबे (४५), कॅनोलीन मुल्ला (२६), एका महिलेची ओळख पटली नाही.**

**शतखंडित महाराष्ट्र!**

**आजचा महाराष्ट्र उभा विभागला गेलेला आहे. 'ते आणि 'आपण' अशी ही विभागणी. ती कोणा ए क्षेत्रापुरतीच नाही. कोणतंही क्षेत्रं घ्या. दोनच कप्पे आणि आपण... आजच्या महाराष्ट्र दिनानिमित्त *गिरीश कुबेर* यांचा विशेष लेख... लोकरंगमध्ये**

# नेहमी चाला

फायदे

पृ.क्र.३८/

83/L

**EXECUTIVE ENGINEER / E – 2 DIVN. / M.B.R. & R.Board**
Ground Floor, Bldg.no.34, Abhyudaya Nagar, Kala Chowki, Mumbai – 33.

No. / E.E. / E-2 / D.E.-I /2307/2016
Date :-30/04/2016

आवक क्र. 2217
दिनांक 07.5.16
उपमुख्य अभियंता प. ३/दुवपू मं.

**COLLAPSE REPORT**

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of the Building | Building No. **12-12A, Forus Road, Kamathipura , 14th lane 'Gulmohar building', Mumbai – 400 008.** |
| 2. | M.C.G.M. Repair Cess No. | E-2152 |
| 3. | Date & Time of Collapse | 30/04/2016 about 2.10 p.m. |
| 4. | Time of collapse message received | 30/04/2016 about 3.00 p.m. |
| 5. | Type of collapse | Building of Ground + 03 upper floor structure, consist in load bearing wall with wooden post (column), wooden beam and joist, wooden staircase was collapsed completely up to ground floor level. |
| 6. | Number of injuries | 04 |
| 7. | Number of casualties | 06 death |
| 8. | Brief Description of building | a. The Building was Ground + 03 upper floor structure having residents as under:- 0 (R) + 04 (NR) = 04 T/s.<br>b. The building was Ground + 03 upper floor structure, consist in load bearing wall with wooden post (column), wooden beam and joist, wooden staircase i.e. constructed in conventional system. |
| 9. | Total Built up area | 160.44 sq.mt. |
| 10. | Whether building is under repairs | The Work Order is issued for repair work through MLC Fund by this Office vide no.1873 Dt. 07/04/2016, and also through MLA Fund vide no.2235 Dt.28/04/2016. Repair work just started. |
| 11. | Name of the Architect | Shri Rashmin Bhandare |
| 12. | Name of the Contractor | M/s. Mohan P. Shinde |
| 13.. | Whether building was repaired | As per documents available in this Office no previous record is available. |
| 14. | Description of collapsed | The above building i.e. Ground + 03 upper floor consist in load bearing wall with wooden beam, post, staircase etc. is collapsed up to ground floor level completely. |
| 15. | Action taken | Due to the incident of the collapsed, the debris of the building has been removed with immediate effect by Fire Brigade Dept / M.C.G.M. with due care to rescue the injured persons. The same operation was continued on war foot level, till the whole debris is removed and the work was completed at about 7.00 to 7.30 p.m. approximately on same day. |
| 16. | Probable Reasons and comments on collapse | On collapse of the above building prima facie the probable reasons of **collapse and comments** are given as follows:-<br>i) The above building is approximately more than 100 yrs old. The same building is consist in conventional method i.e. Load bearing wall, wooden beam post and joist.<br>ii) The collapse of the above building is an **'ACCIDENT'** only, such incidence therefore can not be predicted due to ageing factor of the building and hidden distresses may takes place which can not be ascertained by visual inspection.<br>iii) At present the excavation of existing road in front of the building is in progress for proposed concrete road and as **learnt from the local residents** that the vibrations were observed repeatedly in nearby buildings. |

P.A.
7.5
9/5/2016

(P.T.O.)

प.क्र. ३८/३८

| | | |
|---|---|---|
| | | iv)There was sudden collapse without showing any sign of distress.<br><br>Therefore in view of above aspects, the incidence of collapse of the said building is an **ACCIDENT.** |

Sd/-

Executive Engineer / E – 2 Divn.
M.B.R. & R. Board

Copy submitted to

1. P. A. to Hon'bel Minister (Housing) Mantralaya.
2. P. A. to Hon'bel Minister of State for Housing, Mantralaya.
3. Secretary, Housing & Special Assistance, Mantralaya.
4. Vice President & CEO / MHADA.
5. Hon'ble MLA Shri Amin Patel, Mumbadevi constituency.
6. Hon'ble MLC Shri Bhai Jagtap.
7. Chief Officer / M.B.R & R.Board.
8. Chief Engineer –II / MHADA.
9. Joint Chief Officer / M.B.R & R.Board.
10. Deputy Chief Engineer (Circle- III) / M.B.R & R.Board.
11. Resident Executive Engineer / M.B.R & R.Board.
12. Sr. Police Inspector, Nagpada Police Station.
13. Assistant Municipal Commissioner, 'E' Ward / M.C.G.M.
14. P.R.O / MHADA.
15. Deputy Chief Officer (R.T.) / M.B.R & R.Board.
16. Deputy Chief Engineer / VQC/Mhada.